# लोकसभेतील चर्चा

## (भाग २ – प्रश्नोत्तरे वगळून इतर चर्चा)

## शुक्रवार, डिसेंबर १९, २००८/अग्रहयाणा २८, १९३० (शके)

कृपया पुरवणी सुद्धा पहावी.

**विमुक्त जाती व भटक्या (नोमेडिक) जातींच्या सर्वसमावेशक विकासासाठी कायदा करण्यासाठी प्रस्ताव :**

दुपारी ३ वाजून ३२ मिनिटांनी

**अध्यक्ष (श्री. वरकाला राधाकृष्णन्) :** श्री. हरीभाऊ राठोड, आपण आपले भाषण पुढे चालू करा.

दुपारी ३ वाजून ३२ मिनिटांनी

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** भारत सरकारने विमुक्त समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विधेयक आणावे अशी विनंती मी आपल्या माध्यमातून करतो. त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच राजकीय विकास व्हावा यासाठी त्यांना शिक्षण, सेवा व राजकारणात आरक्षण देण्याचे वेगळे धोरण अमलात आणावे. आज देशामध्ये १५ कोटी लोक अत्यंत वाईट अवस्थेत जीवन कंठत आहेत. ते विकासापासून फारच दूर आहेत.

दुपारी १५ वाजून ३५ मिनिटे (श्री. देवेंद्रप्रसाद यादव अध्यक्ष स्थानी स्थानापन्न झाले)

सभापती महाशय, मी सभेला विमुक्त, विमुक्त आणि भटक्या जमातीबाबत काही सांगू इच्छितो. विमुक्त (डीनोटिफाईड) जातींसाठी १८७१ साली ब्रिटीश सरकारने एक घृणास्पद कायदा पारित केला व त्याद्वारे त्यांना गुन्हेगार ठरवले गेले. आज १४० वर्षांनंतरही त्या जातींना या घृणास्पद कायद्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. हा कायदा त्यावेळी ब्रिटीश सरकारने पारित केला. हा कायदा स्टीफन या सभासदाने पारित केला. त्यांचे म्हणणे असे की, डॉक्टरच्या पोटी डॉक्टर जन्माला येतो व चोराच्या पोटी चोर, गुन्हेगाराच्या पोटी गुन्हेगार व डाकूच्या पोटी डाकू म्हणजेच जो मुलगा या जातींमध्ये/वर्गात जन्म घेतो, तो जन्मतःच अपराधी व गुन्हेगार असतो. या घृणास्पद कायद्यात अशी तरतूद होती की या समूहांना कोठेही फिरण्याची परवानगी नव्हती.

महाशय, त्यावेळी एकदा सुपरिटेंडेंट ऑफ पोलिस यांनी या लोकांना एकदा शिक्षा सुनावली की तो अखेरचा निर्णय समजला जात असे. त्यांना कोर्टात जाण्याचा कोणताच अधिकार नव्हता हा एक अमानुष कायदा होता. जर त्यांना एका गावातून दुसऱ्या गावात जायचे असेल तर त्या गावातील पोलिस स्टेशनमध्ये त्यांना आपले नाव नोंदवणे आवश्यक होते. एवढेच नव्हे, तर एक लोखडांचा शिक्का गरम करुन त्यांच्या कपाळावर मारला जात असे की, त्या योगे हे लोक गुन्हेगार जमातीचे आहेत हे कळावे. ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर इतका घोर अन्याय केला होता व त्याची शिक्षा त्यांना आजही भोगावी लागत आहे.

महाशय, यांना विमुक्त म्हटले गेले आहे, पण प्रत्यक्षात ते स्वतंत्रता सेनानी होते व त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला होता. यात श्री. बिरसामुंडजी रामोजी समाजाचे व गौड समाजाचे मुख्य नायक होते. कंटपा, भिल्ल, संत सेवालाल महाराज यांनी इंग्रजांविरुद्ध अत्यंत तीव्र लढा दिला व इंग्रजांना जगणे मुश्किल केले. ज्या जंगलात हे जायचे त्या त्या जंगलातून इंग्रज सेना त्यांना हाकलून द्यायची. जेथे इंग्रजांचे घोडे जायचे, तेथे हे लोक रस्ता अडवायचे, आग लावायचे, धनुष्यबाणांनी त्यांचे मुंडके उडवायचे. यामुळे १८३२ साली इंग्रजांनी या जातीचे

पूर्वज उमाजी नाईक यांना फाशी दिली. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात तीस हजार कोर्टात ३० हजार लोकांना फाशी देण्यात आली होती. त्यात ७०टक्के लोक विमुक्त (डीनोटीफाईड) जमातीचे होते. भारत स्वतंत्र झाल्यावर १९४९-५० मध्ये अय्यंगारजीच्या अध्यक्षतेखाली क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट इन्क्वायरी कमिटी (गुन्हेगारी कायद्यांच्या चौकशीसाठी समिती) स्थापन केली गेली. त्या समितीच्या अहवालाच्या आधारे पंडीत जवाहरलाल नेहरु यांना या जमातींना ३१.०८.१९५३ रोजी डीनोटीफाय केले म्हणजे विमुक्त केले. ते असे म्हणाले की, मी आज या लोकांना विमुक्त करीत आहे. ते स्वतंत्र पक्षांप्रमाणे कोठेही जाऊ शकतात. त्यांना कोंडवाड्यात ठेवले होते. त्यांना अडकवून ठेवले होते. १४ फूट उंच कुंपण घालून त्यावर वायर लावून त्यात त्यांना डांबून ठेवले होते.

दिल्लीत आजही असे अनेक कोंडवाडे आहेत. देशाच्या प्रत्येक गावात, शहरात, कानाकोपऱ्यात असे कोंडवाडे आहेत. म्हणजेच ब्रिटीश सरकारने ज्यांना गुन्हेगारी जमाती म्हणून नोटीफाय केले होते, त्यांना डीनोटीफाय (विमुक्त) केले आहे म्हणूनच त्यांना डीनोटीफाईड असे म्हटले जाते.

महोदय, हे जे भटके वर्ग होते, ते अनुसूचित केले गेले पण जे नोमेडीक (भटके) होते, म्हणजे ते आपल्या उदरनिर्वाहासाठी, व्यावसायासाठी फिरतात, आपल्या कलेचे प्रदर्शन करतात, त्यांना भटके वर्ग म्हणतात. काका कालेलेकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला आयोग १९५३ मध्ये स्थापित करण्यात आला, त्यात अनुसूचित भटक्या वर्गाबाबत (डीनोटीफाईड नोमेडीक ट्राईब्ज) चर्चा केली होती व आयोगाने शिफारस केली की या वर्गांना अनुसूचित जाती व जमातींच्या सवलती दिल्या पाहिजेत, त्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारेल. परंतु दुदैवाने सरकारने काका कालेलेकरांचा अहवाल फेटाळला. त्याचा परिणाम आजही कोट्यावधी लोकांना भोगावा लागत आहेत. हे लोक आजही विकासापासून फार दूर आहेत.

पंडीत जवाहरलाल नेहरुंच्या आदेशानुसार तिसरी पंचवार्षिक योजना तयार केली गेली. तिचे काम चालू असताना सर्व राज्यांना आदेश दिला गेला की, अनुसूचित भटक्या जातींसाठी काही योजना तयार करावी. परंतु दुदैवाने अनेक राज्यांनी सादर केलेल्या यादीत त्यांच्यासाठी कोणतीही योजना तयार केली नाही, सवलत दिली नाही. या अहवालाकडे कोणीही लक्ष दिले नाही.

लालबहादूर शास्त्रीजींनी असा विचार केला की, हे लोक फार मागासलेले आहेत. त्यावेळी त्यांना शैक्षणिक सवलती दिल्या गेल्या. जसे फी माफी, मॅट्रीक नंतर शिष्यवृत्ती, महाविद्यालयात जायला भारत सरकारची शिष्यवृत्ती इत्यादी. तथापी अनेक राज्ये अशी आहेत की त्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती या जातींसाठी होती हे माहीत नव्हते. अनुसूचित भटक्या (डीनोटीफाईड नोमेडीक ट्राईब्ज) जमातीतल्या लोकांना हे ही माहिती नव्हते की ते भटक्या अनुसूचित जमातीत मोडतात. आज मी अंदाजे ४०० जातींबाबत बोलत आहे. अंदाजे ४०० ते ४५० जाती यात मोडतात. ज्या जातींबाबत मी बोलतोय त्यांना रेणके आयोग आपल्यासाठी होता हेच माहिती नाही. परंतु आपल्या माध्यमातून मी अशी विनंती करतो की प्रत्येक राज्यात या जातींची/जमातींची

जी एक यादी आहे ती जारी करावी, तसेच या जातींसाठी जो रेणके आयोग निर्माण केला गेला होता, त्याची माहिती दूरदर्शन व वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून प्रत्येक ठिकाणी पोहचली पाहिजे.

महाराष्ट्र राज्य हे एक प्रगत राज्य आहे. तेथे छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारे काम करणारे श्री. वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले. त्यांनी या योजना आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन विमुक्त समाजासाठी ४टक्के आरक्षण दिले. त्यांनी या समाजासाठी शिक्षण वैद्यकशास्त्र (मेडीकल), अभियांत्रिकी (इंजिनिअरींग), तंत्रशास्त्र (टेक्निकल) या शाखेतील शिक्षण, तसेच या शाखेतील नोकऱ्यांमध्ये बढती दिली. त्यामुळे महाराष्ट्रात क्रांती झाली व विमुक्त भटक्या समाजाचे लाखो लोक नोकरीला लागले. या समाजातील लोक डॉक्टर, इंजिनिअर झाले व विकासाच्या मुख्य समाजात सामील झाले. परंतु यांना केंद्रसरकारकडून काहीही मिळाले नाही. महाराष्ट्र राज्य सरकारने त्यांना सुविधा, सवलती दिल्या, परंतु राष्ट्रीयकृत बँका, रेल्वे, पोस्ट ऑफिस, जीवन विमा निगम, सर्वसामान्य विमा निगम व केंद्र शासनाच्या अंतर्गत येणारी अनेक कार्यालये आहेत की ज्यामध्ये या वर्गाचा एखादा क्लास वन किंवा क्लास टू ऑफिसर सोडा, शिपाई सुद्धा नेमला गेला नाही.

महाशय, यांना महाराष्ट्रासारखी सुविधा व सवलत पूर्ण देशात मिळाव्या अशी माझी मागणी आहे. महाराष्ट्रात लागू केलेले आरक्षणाचे धोरण पूर्ण देशात लागू केले पाहिजे. राष्ट्रीय रोजगार श्रम योजना देशाने महाराष्ट्राकडून घेतली आहे. महाराष्ट्राने एक प्रागतिक व क्रांतीकारी योजना देशाला दिली आहे म्हणून आपल्या माध्यमातून सरकारला अशी विनंती करतो की, महाराष्ट्रातून लागू केलेले (आरक्षणाचे) धोरण सर्व देशाला लागू करावे, की जेणेकरुन १५ कोटी लोकांना त्याचा फायदा होईल.

महोदय, ब्रिटीश सरकारने या लोकांसाठी १९१३ मध्ये डीनोटीफाईड वसाहत उघडली होती. त्यामध्ये त्यांच्यासाठी वेगळ्या अर्थसंकल्पीय प्रावधानाची तरतूद केली होती. त्यांच्या शिक्षणाची, शिष्यवृत्तीची व्यवस्था केली होती. त्यांच्या नोकरी व्यवसायासाठी आजही कापड गिरण्या तेथे उपलब्ध आहेत. परंतु जे ब्रिटीश सरकारने केले, ते आमच्या सरकारने परत घेतले. जे ब्रिटीश सरकार करीत होते ते काम आम्ही करु शकत नाही. आमच्या सरकारने त्यांच्यासाठी अर्थसंकल्पातील प्रावधान बंद का केले? १९५३-५८ मध्ये पंडित नेहरुंनी असे वक्तव्य केले होते "विमुक्त नोमेडीक ट्राईब्जसाठी कोट्यावधी रुपयांची वेगळी अर्थसंकल्पातील प्रावधानाची तरतूद होती ती का बंद झाली?" हे वक्तव्य आजही योजना आयोगाच्या दप्तरी आहे. महोदय आपल्या माध्यमातून याची चौकशी झाली पाहिजे.

महाशय, ज्यावेळी मंडल आयोगाची स्थापना झाली त्यावेळी मंडल आयोगाने असे म्हटले की नोटीफाईड अँड नोमेडीक ट्राईब्ज (विमुक्त व भटक्या जाती) आमच्या कार्यकक्षेत येत नाहीत. हे लोक फारच

मागासलेले आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीपेक्षाही यांची परिस्थिती वाईट आहे. आम्ही यांचे इतर मागासलेल्या जातीत वर्गीकरण करतो. त्यांनी आपल्या शिफारसींचा परिच्छेद १३.३७ मध्ये अशी शिफारस केली आहे की, कोळी (धीवर), कुंभार, बंजारा, पाल, गडरिया यासारख्या जाती आजही अत्यंत वाईट जिणे जगत आहेत, त्याचे वर्गीकरण आम्ही इतर मागासलेल्या जातीत करीत आहोत. परंतु त्यांना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीप्रमाणे सवलती दिल्या पाहिजेत. त्यांच्यासाठी वेगळे मंत्रालय केले पाहिजे अशा मंडल आयोगाच्या शिफारसी होत्या. श्री. एल.आर. नाईक हे मंडल आयोगाचे एक सदस्य होते. मंडल आयोगाने इतर मागासलेल्या जातींसाठी २७ टक्के आरक्षणाची जी शिफारस केली होती, ती श्री. नाईक यांना मान्य नव्हती. त्यांनी आपला मतभेद दर्शवणारी टिप्पणी लिहिली होती. त्यांनी सदर टिप्पणीमध्ये मागासलेल्या वर्गाची विभागणी दोन गटात केली. १. मध्यस्तरीय जाती २. वंचित मागासलेल्या जाती. त्यांनी सुचवले की, वंचित मागासलेल्या जातींना सुरक्षा व प्राधान्य दिले पाहिजे. त्यांच्यासाठी वेगळे आरक्षण असले पाहिजे की ज्यायोगे मागासवर्गीयातील अधिक प्रगत त्यांचे शोषण करु शकणार नाहीत. श्री. नाईक यांनी आपल्या टिप्पणीमध्ये असा प्रस्ताव मांडला की, 'सामायिक यादींचे दोन भाग करावेत गट अ आणि ब. "अ" गटामध्ये राज्य व केंद्रशासीत प्रदेशांच्या यादीमध्ये वंचित वर्ग असा उल्लेख आहे त्यांचा समावेश होईल व "ब" गटामध्ये मागासलेल्या वर्गातील मध्यस्तरीय जाती यांचा समावेश होईल.'

राज्य व केंद्रशासीत प्रदेशांच्या संदर्भात वंचित गटांची यादी सूचीमध्ये दिलेली आहे. आपल्याला असे दिसून येईल की, जे लोक सुस्थितीमध्ये आहेत त्यांना राजकीय आरक्षण दिले जात आहे याचा अर्थ असा होतो की, जे लोक गरीब होते, खऱ्या अर्थाने मागासलेले होते, ते मागासलेलेच राहिले व जे सुस्थितीत होते त्यांना आरक्षण मिळाले. आपण २७ टक्के आरक्षणाचा अभ्यास केला तर आपल्याला असे लक्षात येईल की त्यातील जास्त लोक प्रगत जातीतीलच आहेत. आरक्षणाचा लाभ कोणाला मिळत आहे याबाबत आपण कृपया चौकशी समिती नेमावी. ३३ टक्के आरक्षण कोणाला मिळत आहे? जे लोक मागासलेले आहेत, त्यांना खऱ्या अर्थाने आरक्षण मिळाले पाहिजे. पण त्यांना ते मिळत नाही. यामागे राजकारण आहे. दुदैवाने त्यावेळी श्री. एल.आर. नाईक यांचे म्हणणे कोणीच ऐकले नाही. जेव्हा ओ.बी.सी. च्या नावाने जगभर वणवा पेटला होता, तेव्हाही हा मुद्दा कोणीच उपस्थित केला नाही.

काल मी टाईम्स ऑफ इंडीया वाचत होतो. त्यात एक लेख छापून आला आहे. त्यात असे म्हटले की श्री. एल.आर.नाईक यांचे म्हणणे अमलात आणण्याची वेळ आली आहे. मंत्री महोदया श्रीमती मीरा कुमार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मागासलेल्या वर्गाचे एक अधिवेशन भरले होते. त्यात त्यांनी एक फार चांगली सूचना केली. त्यांनी सांगितले की, देशात वर्गीकरण झाले पाहिजे. मी हेच म्हणत आहे. माझे म्हणणे असे आहे

की, वर्गीकरण केवळ विमुक्त व भटक्या जातींबाबत झाले पाहिजे. मी इतर मागासवर्गीयांच्या वर्गीकरणाबाबत बोलत नाही. जे लोक विमुक्त व भटक्या जातींचे आहेत, ज्यांचा समावेश इतर मागासलेल्या वर्गामध्ये आहे, अशांचे वेगळे वर्गीकरण झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

मोठा मासा छोट्या माशाला गिळत आहे अशी सध्या परिस्थिती आहे. हे सगळे राजकीय दबावामुळे होत आहे. आपल्याला याचे परिणाम भोगावे लागतील. आपल्याला कदाचित आठवत असेल, इंदिरा साहनी खटल्याच्या संदर्भात मंडल आयोगाची चर्चा सर्वोच्च न्यायालयात झाली.

माननीय उच्च न्यायालयाने इंद्र साहनी विरुद्ध भारत सरकार या खटल्याचा निकाल देताना मागासवर्गीयांच्या वर्गीकरणाबाबत भारत सरकार व राज्य सरकारांना स्पष्ट सुचवले आहे की, इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट झालेल्या व मोठ्या संख्येने असलेल्या अनेक जातींची सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीची पातळी सारखी नाही. मा. न्यायालयाने पुढे असेही म्हटले की जातीजातींमध्ये फार मोठा फरक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा तो भाग मी खाली देत आहे :-

"९२ (अ) मागासवर्गीयांचे वर्गीकरण मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे करण्यात कोणताच घटनात्मक किंवा कायदेशीर अडथळा नाही आमचे मत आहे. असे केलेच पाहिजे असे आमचे म्हणणे नाही. जर एखाद्या राज्याने वर्गीकरण केले तर ते अवैध होईल का? आमच्या मते ते अवैध होणार नाही. मंडल आयोगाने कोणता निकष लावला आहे? ज्या जातीला, गटाला किंवा वर्गाला अकरा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाले तो मागासलेला वर्ग समजला जाईल. हजारो जाती, गट, वर्ग यांना समान गुण मिळालेले नाहीत. अशा अनेक जाती, गट, वर्ग आहेत की ज्यांना २० ते २२ गुण मिळाले आहेत व असेही आहेत की ज्यांना ११ ते १३ गुण मिळाले आहेत. या दोन जाती/गट/वर्गामध्ये फरक नाही. उदारणार्थ व्यावसायिक गट घ्या. सोनार आणि वड्डे, (दगड फोडण्याचा पारंपारिक व्यवसाय करणारे आंध्रप्रदेशमधील व्यावसायिक) हे दोन्ही इतर मागसवर्गीयात समाविष्ट आहेत. सोनार वड्डेपेक्षा खूपच पुढारलेले प्रगत (कमी मागासलेले) आहेत हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही. जर दोघांना एकाच गटात समाविष्ट केले व त्या गटाला आरक्षण दिले, तर सोनारच सर्व आरक्षण लाटतील व वड्डेंना काहीच उरणार नाही. अशा स्थितीमध्ये मागासलेल्या वर्गांमध्ये अधिक मागासलेल्या वर्गांना त्यांच्यासाठी असलेले आरक्षण (फायदे) मिळावे यासाठी इतर मागासवर्गीयांमध्ये आरक्षण करणे आवश्यक आहे असा विचार एखादे राज्य करु शकेल."

महाशय, सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांनी जो निर्णय दिला त्यावर कोणत्याच सरकारने लक्ष दिले नाही. सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे, श्री.एल.आर. नाईक यांचे म्हणणे तसेच मागासवर्गीय

आयोगाचे म्हणणे बरोबर होते. परंतु मला असे वाटते की ही मागणी कोणीही करीत नाही व कोणीही न्याय देत नाही.

महाशय असे मार्गदर्शन केल्यानंतरही कोणीही याकडे लक्ष दिले नाही व केंद्र सरकारने सुद्धा याबाबत काही पावले उचलली नाहीत. गेली ६० वर्षे विमुक्त व भटक्या जातींचे लोक त्यांचा समावेश अनुसूचित जाती /जमातींमध्ये करण्याची मागणी करीत आहेत. हल्ली कोणत्याही जाती त्यांचा अनुसूचित जाती /जमातींमध्ये समावेश करण्यासाठी मागणी करतात. १९६७ मध्ये या जातींचा एससी/एनटी मध्ये समावेश करण्यासाठी एक विधेयक आणले गेले होते. त्याला तीव्र विरोध झाला. त्यावर संयुक्त सांसदीय समितीची नेमणूक झाली. मग ते विधेयक संसदेत आणले गेले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अथक प्रयत्नानंतर सुद्धा ते विधेयक पूर्ण तऱ्हेने मंजूर झाले नाही. राज्यांमध्ये विभागांची बंधने घालून विधेयक मंजूर झाले. श्रीमती गांधींवर सर्व पक्षांच्या अनुसूचित जमातीच्या खासदारांनी दबाव आणला व विधेयक मंजूर होऊ दिले नाही. श्रीमती गांधी व मागासलेल्या समाजाचे नेते माननीय बाबू जगजीवनराम यांनी अथक प्रयत्न केले तरीही...... (अडथळा)

**सभापती महाशय (श्री. देवेंद्र प्रसाद यादव) :** आता काही माननीय सदस्यांना बोलायचे आहे तेव्हा आपण आपले भाषण समाप्त करा.

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** श्रीमती इंदिरा गांधी व श्री. बाबू जगजीवनराम यांचे स्वप्न आजही अपूर्ण आहे.

**सभापती महाशय :** ठीक आहे, आपण आपल्या वेळेच्या मर्यादेचे भान ठेवा.

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** महाशय, या घटनेने असे ध्यानात येते की, जरी कोणताही समाज अनुसूचित जाती/जमातीचा दर्जा प्राप्त करण्यायोग्य असेल तरीही राजनैतिक दबावामुळे हे आता फार अवघड आहे. याचा अर्थ असा होतो की, कोणत्याही जातीच्या अनुसूचित जाती/ जमातीचा या यादीमध्ये समावेश करणे किंवा यादीमधून कोणत्याही जाती, जमातीला वगळणे हे अत्यंत अवघड झाले आहे म्हणून आम्ही त्याची मागणी करणे बंद केले आहे, कारण जे मिळणार नाही, त्यासाठी भांडायचे नाही, ते मागायचे नाही असे आम्ही ठरवले आहे. मात्र मंडल आयोगाने व श्री. एल.आर. नाईक यांनी दाखवलेला एक मार्ग शोधला आहे तो म्हणजे भारताच्या राज्य आयोगामध्ये अनुसूचित जाती/ जमातींसाठी जशी तरतूद आहे, तशीच विमुक्त भटक्या जातींसाठी तरतूद व्हावी व सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, शैक्षणिक क्षेत्रात व नोकरी व बढती यामध्ये आरक्षण असावे. यासाठी मी एक खाजगी विधेयक आणले आहे. त्या सर्व गोष्टी नमूद केल्या आहेत, परंतु ते अद्याप प्रलंबित आहे.

**सभापती महाशय :** आपण आपले भाषण संपवावे.

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ)** : महाशय, राष्ट्रीय लोकशाही आघाडीने न्यायाधीश व्यकंटचलैया यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय राज्य घटनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी एक आयोग स्थापन केला (नॅशनल कमीशन टू रिव्ह्यू दी वर्किंग ऑफ कॉस्टिट्यूशन ऑफ इंडिया) भारतीय राज्यघटना व्यवस्थित काम करत आहे की नाही? घटनेनुसार लोक सुखी आहेत की नाही हे पाहणे हे या आयोगाचे काम आहे. आम्ही त्यांनाही निवेदन दिले होते व विचारले होते की तुम्ही आम्हाला का विसरलात? हे लोक घटनेच्या कक्षेत का येत नाहीत?

"विमुक्त भटक्या जातींसाठी घटनेमध्ये जागा ठेवा. हा घटनेच्या सामायिक यादीचा एक विषय आहे. हा राज्यांच्या यादीत सुद्धा आहे, पण अजून त्याची फाईल उघडली नाही. व्यकंटचलैया यांनी सांगितले की यासाठी एक आयोग निर्माण करा. ते म्हणाले होते.

विमुक्त जाती/ जमातींना चुकीने गुन्हेगारी करणाऱ्या जाती ठरवले गेले आहे व कायद्याच्या प्रतिनिधींनी व सर्व समाजाने त्यांना विनाकारण छळलेले आहे व त्यांचे शोषण केले आहे."

"विमुक्त भटक्या जातींच्या हक्क समितीने सादर केलेल्या निवेदनावर आयोगाने विचार केला आहे व ते निवेदन सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही अशी सूचना केली आहे की, त्यांनी शक्यतो आयोगामार्फत या विषयाचा अवगत करावे."

या शिफारसीनुसार आम्ही मागणी केली होती. आमच्याबरोबर भटक्या जमातीचे नेते महाश्वेताजी गोपीनाथ मुंडे, रणजीत नाईक, प्रमोद महाजन, गायकवाड, रामदास आठवले इत्यादी माननीय सदस्य तत्कालीन गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांना भेटले. तसेच प्रधानमंत्र्यांनाही त्यांनी निवेदन दिले. त्यांनी (प्रधानमंत्र्यांनी) या प्रश्नाच्या विचारासाठी श्री. मोतीलाल नायक यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोगाची स्थापना केली. मी आयोगाचा सदस्य होतो. भारतीय जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहिरनाम्यात असे नमूद केले होते की, आम्ही एक आयोगाची नेमणूक करु व या लोकांचे कल्याण करु. त्यांनी तसे केले. त्यासाठी मी भारतीय जनता पक्षाला खूप धन्यवाद देतो. या आयोगाचा अहवाल ०२ जुलै रोजी सरकारकडे आला आहे. माननीय पंतप्रधानांनी पत्र लिहून मला कळविले आहे की, लवकरच ही बाब मंत्रीमंडळासमोर सादर करु. एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी मला सांगितले की ही बाब विचाराधीन आहे. जेव्हा आम्ही तीन वर्षापूर्वी प्रधानमंत्र्यांना भेटलो होतो तेव्हा त्यांनी आमच्या मागण्यांवर डॉ. गणेश देवींच्या अध्यक्षतेखाली एक टी.ए.जी.ची स्थापना केली होती. या टी.ए.जी.ला तीन महिन्याच्या आत अहवाल सादर करायला सांगितला होता. टी.ए.जी. यांनी आपला अहवाल तीन महिन्यात दिला, पण हा अहवाल प्रधानमंत्र्यांच्या कार्यालयापर्यंत पोचला की नाही, कोठे गेला, त्याचे पुढे काय झाले याचा काहीही पत्ता लागत नाही. मला भीती वाटते की बऱ्याचशा आयोगांचे,

समितींचे अहवाल दडपून ठेवण्यात आले आहेत व त्यांचेकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. या देशात १५ कोटी लोक गेली ६० वर्षे मोकळ्या आकाशाखाली हताशपूर्ण व निराश जीवन जगत आहेत. त्यांच्यावर दररोज अत्याचार होत आहेत व त्यांचा छळ केला जात आहे. आजही पोलिस खात्यात असे शिकवले जाते की ट्रायबल्स म्हणजे अपराधी. आजसुद्धा जर आमच्या इथे डाका पडला तर वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून येते की पारधी समाजातील व्यक्तीला अटक केली. अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या नावाने न ओळखता त्याच्या समाजाच्या नावाने वर्तमानपत्रात बातमी छापली जाते. जेथे जेथे पारधी समाजातील लोक फिरतात तेथे तेथे त्यांच्यावर दगडफेक होते, त्यांना जिवंत जाळले जाते, त्यांना मारपीट होते, त्यांच्यावर अन्याय होतो. त्यांना गुन्हेगार संबोधण्यात येते. सरकारने ज्यांना गुन्हेगार ठरवले होते ते तर स्वातंत्र्यसैनिक होते, त्यांनी सरकारविरुद्ध लढा दिला होता म्हणून तत्कालीन सरकारने त्यांना गुन्हेगार ठरवले. थे इंग्रजांविरुद्ध लढले म्हणून इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरवले, पण आजही या लोकांवर अन्याय व अत्याचार होत आहेत, त्यांचा अपमान होत आहे. आजही त्यांना गुन्हेगारांसारखे वागवले जात आहे. त्यांच्यावरील कलंक पुसला गेला नाही. म्हणून या समाजासाठी अपराधी या शब्दाचा वापर केला जातो. कै.जवाहरलाल नेहरुजींनी त्यांना विमुक्त भटक्या जाती असे घोषित करुन सन्मान प्रदान केला, पण अत्याचारातून त्यांना मुक्ती मिळाली नाही. आजही त्यांचा उपयोग पोलिस डायरी पूर्ण करण्यासाठी, पोलिसांचे प्रमोशन पूर्ण करण्यासाठी व इतर राजकारण्याची व्होट बँक म्हणून होत आहे. जर या कोट्यावधी लोकांवर असा अत्याचार होत असेल, तर त्यांना पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढावे लागेल. त्यांच्या मनात हीच भावना आहे की देश स्वतंत्र झाला, पण आम्हाला स्वातंत्र्य मिळाले नाही. म्हणून या लोकांना स्वातंत्र्याचे लाभ मिळाले नाही यांचेकडे रेशनकार्ड नाही, त्यांना डोक्यावर छप्पर नाही, या लोकांना आजही ठिकठिकाणी भटकावे लागते व खुल्या आकाशाखाली रात्र काढावी लागते. त्यांना भीक मागून पोट भरावे लागते.

मी यूपीएच्या चेअरपर्सन श्रीमती सोनिया गांधींना निवेदन करु इच्छितो की, या लोकांसाठी जो रेणके आयोग स्थापन केला त्यांच्या शिफारसी अमलात आणाव्या व त्यांना शिक्षण, नोकऱ्या व राजकारणात ६० टक्के आरक्षण द्यावे. श्री. लालकृष्ण अडवाणी, श्री. लालूप्रसाद यादव, श्री. मुलायमसिंह यादव, श्री. रामविलास पासवान, राज्यसभेचे सभापती महाशय, उपसभापती महाशय, शरद यादवजी कल्याणसिंहजी यांच्यासह सर्व माननीय सदस्यांना मी विनंती करतो की त्यांनी त्याबाबत विचार करावा व या गरीबांना न्याय द्यावा. १५ कोटी लोक ४०० जातीत विखुरले गेले आहेत. परंतु समाजाच्या इतर वर्गांबरोबर त्यांना लाभ मिळत नाहीत. या लोकांना आज भटक्यांचे जीवन जगावे लागत आहे.

माझ्याकडे या ४०० जातींची यादी आहे पण वेळे अभावी मी ती वाचून दाखवू शकत नाही, पण मी त्यातील काही जातींचा उल्लेख करीन. आंध्रप्रदेशमधील पाईडीस, येरुकुलारु, डोंगायानाडी, जांगलास, दासरी

आहेत. छत्तीसगड मध्ये बंजारा, बैरागी, पारधी, पासी आहेत. यात नोमेडीक (भटक्या) जाती, माट, जांगी, जोशी, गोसाई, धनगर, कसाई, राजगोदे, देवार इत्यादी आहेत. दिल्लीमध्ये विमुक्तजातीत अहेरिया, वंजारा, भील, बावरिया, खरिक, मुल्लाह इत्यादी. गुजरातमध्ये कोळी, हीगोरा, छाटा, बफन व भटक्या जातीत नाथ, जनिया, वाडी, तुरी, गारा, जोगी, गडलिया, घोटीया, चारण इत्यादी. हरियाणामध्ये बरार, बअुरिया, नट, सांसी व बंगाली या एकूण ४०० जाती आहेत व त्यांची यादी माझ्याकडे आहे. मध्यप्रदेशमध्ये सांसी, बालदिया, बंजारा, कंजर, वागरी, नट, पासिया, बैरागिया इत्यादी. ६२ जाती आहेत. महाराष्ट्रातील लोकांना या जातीतील समाविष्ट जाती सांगण्याची गरज नाही कारण त्यांना माहिती आहे. तामिळनाडूमध्ये सुद्धा अशा तऱ्हेच्या अनेक जाती आहेत. उत्तरप्रदेशात बंजारा, राजभर, कहार, कैदर, धोसी, लौध, जोगी, जोगा, सपेरा, गोसाई, बारगी, महावल, मदारी, औघड वैद, वृजवासी, सिंगीवाल, कनयोलिप इत्यादी. यांना कदाचित माहिती असेल/नसेल की रेणके आयोगाची स्थापना यांच्यासाठी झाली. त्यांना माहितही नाही की हे लोक विमुक्त आहेत. इंग्रजांनी यांना सूचित केले होते, नंतर त्यांना विमुक्त केले गेले. मंडल आयोगानंतर हा सगळ्यात मोठा मुद्दा झाला. मंडल आयोग याच्यापुढे काहीच नाही. त्यामध्ये सगळ्याच लोकांना फायदा झाला होता. परंतु या दबलेले व चिरडले गेलेले लोक आजसुद्धा समाजापासून वेगळे आहेत व मुख्य धारेत नाहीत. मी विनंती करतो की, सरकारने त्यांना मुख्य धारेत आणावे. आज त्यांच्याकडे रेशनकार्ड नाही, रहायला घर नाही, त्यांच्यावर पोलिस अत्याचार करतात. रेल्वे स्टेशनवर माझा एक मित्र काम करतो. तो काल सांगत होता की, रात्री दोन वाजता आम्ही कामावरुन परत येतो, तेव्हा हे लोक झोपलेले असतात. पोलिस त्यांना काठीने मारतात व हाकलून लावतात व त्यांना पळवून लावतात.

जेव्हा मला याची आठवण करुन दिली जाते तेव्हा ते मला विचारतात, आपण यांच्यासाठी काम करीत आहात काय? आज यांच्याकडे घर नाही. ही माणसे जेव्हा रात्री ऊस कापायला जातात तेव्हा त्यांना रात्री थंडीत लाथ मारुन उठवले जाते. जे मजूर ऊस कापायला जातात त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नाही. या भटक्या जाती आहेत व त्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय व वाईट आहे. देशातल्या १५ कोटी लोकांबाबत कोणीच बोलत नाही.

मला असे वाटायला लागले आहे की, कदाचित या सभागृहात हे माझे शेवटचे भाषण असेल कारण लोकसभेची निवडणूक जवळ आली आहे, म्हणून माझे म्हणणे दडपू नका. हा १५ कोटी लोकांच्या भावनांचा व विकासाचा प्रश्न आहे. सभागृहात बसलेल्या पक्षाच्या आणि विरोधकांच्या नेत्यांना माझी विनंती आहे की आगामी लोकसभा निवडणूकीच्या आधी वरील मुद्दयांवर लक्ष देऊन यांच्यासाठी केलेल्या आयोगाच्या शिफारसी त्वरीत लागू कराव्यात की ज्यायोगे विमुक्त समान विकासाच्या मुख्य धारेत खाली येतील.

**सभापती महोदय (श्री. देवेंद्र प्रसाद यादव) :** आता आपण आपले भाषण संपवावे. आपल्या प्रस्तावावर अनेक माननीय सभासद बोलू इच्छितात. आपल्याला नंतर बोलण्याची संधी मिळेल.

श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) : माझा प्रस्ताव सभेने एकमताने मंजूर करावा अशी मी विनंती करतो. देशातल्या १५ कोटी लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी व त्यांना सामाजिक न्याय मिळण्यासाठी सर्व सन्माननीय सदस्य माझ्या बरोबर असतील व माझ्या प्रस्तावास मान्यता देतील अशी मी आशा करतो. धन्यवाद

(इती)

**सभापती महोदय (श्री. देवेंद्र प्रसाद यादव) :** ठराव प्रस्तावित केला.

''हे सभागृह बंजारा जातीसह विमुक्त जाती व भटक्या जातींच्या दयनीय परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करते व सरकारला त्यांच्यासाठी खालील बाबतीत आवश्यक कायदा करण्याची विनंती करते :

१. त्यांची शैक्षणिक व आर्थिक प्रगती साधणे.

२. राज्यशासनाच्या सेवेमधील पदांवर त्यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद करणे.

३. त्यांच्यासाठी लोकसभा व राज्याच्या विधानसभांमध्ये राखीव जागा ठेवणे.

४. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अन्य सर्व उपाय करणे.

दुपारी ४ वाजून ७ मिनिटांनी

**श्री. अधीर चौधरी (बेहरामपूर, पश्चिम बंगाल) :** माननीय सभापती महोदय, माझे सहकारी माननीय हरीभाऊ राठोड यांनी देशातल्या विमुक्त, भटक्या व अर्ध भटक्या जातींच्या लोकांच्या कल्याणासाठी पुढाकार घेऊन विधेयक आणले. त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. आपण या अत्यंत वेगळ्या तऱ्हेच्या विधेयकावर चर्चा करीत आहोत. भारताला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली परंतु आपण अजूनही इंग्रजांच्या साम्राज्यवादी प्रशासकीय पद्धतीला लोंबकळत आहोत. आपल्या देशातल्या अनेक लोकांना देशाचे असूनही रहायचा पत्ता नाही, मतदानाचा हक्क नाही. सार्वजनिक (अन्न-धान्य) वाटप प्रणाली अंतर्गत अन्न घेण्याचा हक्क नाही. कारण त्यांच्याकडे रेशनकार्ड नाही. भटक्या जातीतले हे लोक अत्यंत दयनीय स्थितीत जागोजागी फिरत असतात. त्यांना आत्यंतिक गरीबी, दुर्लक्ष याचा फटका बसला आहे व त्रास होत आहे.

मला असे वाटते की, हे आपल्या देशाचे राज्य नसलेले नागरीक आहेत ते आपली भूमी वापरतात, पण त्या भूमीपासून मिळणाऱ्या संधी व फायदा यापासून ते वंचित आहेत. आपल्या घटनेने अनुसूचित जाती व जमातींच्या हक्काचे संरक्षण अनेक तरतूदींद्वारे केले आहे, परंतु अशा अनुसूचित जाती व जमाती आणि हे विमुक्त व भटक्या जाती यांच्यामध्ये साम्य असूनही त्यांना मात्र त्यांचे हक्क मिळत नाहीत हा विरोधाभास मला जाणवतो.

महोदय, आपण जर देशाच्या इतिहासाचे अवलोकन केले तर आपल्याला लक्षात येईल की, बहुतेक भारतीय लोकांचे पूर्वज भटक्या (नोमेडीक) जातीचे होते. आपण जाटांचे उदाहरण घेऊ. जाट लोक सिथियन लोकांचे वंशज आहेत. या सिथियन लोकांची राजधानी सिथिया ही सध्याच्या युक्रेन (सेव्हिएट रशिया) येथे आहे. हे सिथियन भटके घोडेस्वार दक्षिणेत अधूनमधून आक्रमण करायचे. ख्रिस्तपूर्व नववे शतक ते दुसरे शतक या काळात त्यांची भरभराट झाली. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात समारिटन लोकांनी त्यांच्यावर विजय मिळवला, यावरुन आपण असे म्हणू शकतो की जाट समाजाचे पूर्वज हे भटक्या जातीचे होते.

अहिरांचे पूर्वज कोण? अहीर हे भटक्या (नोमेडीक) जातींचे आहेत व ते भारतात कसे आले हे स्पष्टपणे ज्ञात नाही. सातवाहनीचा उत्तराधिकारी राजा अभीर मानला जाता. दख्खनच्या उत्तर पश्चिम भागात शकांचा उत्तराधिकारी राजा मथारीपुत्र ईश्वरसेन मानला जातो. अलेक्झांडरने भारतावर आक्रमण केले तेव्हा पंजाबमध्ये अभीर अत्यंत सामर्थ्यवान होते.

गुजर यांचे उदाहरण घ्या. गुजर लोक भारतात हूण लोकांबरोबर आले. ही जात शेती व मेंढ्या राखणे हा व्यवसाय करणारी जात आहे. राजपूत हे हूण व सिथियन यांचे वंशज आहेत. त्यामुळे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ६० वर्षांनी जर आपण हे लोक भटके आहेत का विमुक्त आहेत हे ठरवत बसलो तर तो आपल्या देशाचा अपमान ठरेल व आपल्या लोकशाहीवर हक्काचे उल्लंघन ठरेल व अनेक आंतरराष्ट्रीय संकेतांचे उल्लंघन ठरेल.

घटनेच्या १४व्या कलमामध्ये कायद्यासमोर सर्व नागरीक समान आहेत असे ठरले आहे. १५वे कलम भेदभावाला विरोध करते. २९वे कलम जीवित व वैयक्तिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. भटक्या व विमुक्त जातींना आपली घटना हे अधिकार देऊ शकली का? निश्चितच नाही. पण असे का? आपण याबाबत गंभीर का नाही? आपल्या देशबांधवांवर आपले मनःपूर्वक प्रेम आहे का? खरेतर या भटक्या व विमुक्त जाती असे म्हणू शकतात की त्या राष्ट्रीय जाती आहेत कारण त्यांची देशात रहाण्याची अशी जागाच नाही. पण ते आपल्या देशाचे आहेत. मी सुद्धा यामुळे गोंधळुन गेलो आहे. या जाती १८७१ मध्ये निर्माण झाल्या आहेत हे आपण जाणतो. श्री. राठोड यांनी सांगितल्याप्रमाणे ब्रिटीश साम्राज्यवादी सत्तेचे त्यांच्या मनानेच ठरवले की ह्या जाती गुन्हेगार आहेत. ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी त्यांच्यावर केलेल्या अत्याचारा विरुद्ध व दडपशाही विरुद्ध त्यांनी आवाज उठवला. म्हणून ब्रिटीश लोक त्यांच्यावर नाराज झाले. या स्वातंत्र्यवादी लोकांचा प्रभाव कमी करण्यासाठी ब्रिटीशांनी त्यांना गुन्हेगार ठरवले. एखाद्या समाजाच्या काही सदस्यांनी गुन्हे केले म्हणून सर्व समाजाला गुन्हेगार ठरवणे असे जगात कुठेही झाले नाही. पण आमच्या देशात ब्रिटीश साम्राज्यवादांनी स्वतःच्याच मताने एका मागून एक समाज जाती यांना गुन्हेगार ठरवले. त्यासाठी त्यांनी गुन्हेगार जाती कायदा असा कायदा १८७१ साली पारित केला. त्यावेळी तो आपल्या देशाच्या उत्तर पश्चिम भागात अमलात आणला गेला. त्यानंतर १९११ साली हा कायदा सर्व देशाला लागू झाला.

स्वातंत्र्यानंतर १९५२ साली भारत सरकारने हा कायदा रद्द करण्यासाठी पुढाकार घेतला. आपल्या देशातील लोकांवर लादलेले हे लांछन पुसण्यासाठी हे आवश्यक होते. तरीसुद्धा देशातील लोकांच्या मनात अजूनही संशय व अविश्वास आहे, हे सत्य आहे. तथापी, ज्या लोकांकडे स्वतःचा निवारा नाही, त्यांच्या मनात अजूनही भीती व अविश्वास रेंगाळत आहे.

ब्रिटीश अधिकाऱ्यांनी त्यांना कायमच्या सुधारगृहात जायची सक्ती कशी केली हे पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल. तो अक्षरशः तुरुंग होता. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या शेतात स्वस्तात काम करायला मजूर मिळावेत म्हणून ब्रिटीशांनी भारतातील नागरीकांना सक्तीने श्रमशिबिरात रहायला लावले. याची तुम्ही कल्पना करु शकता का? त्या श्रमशिबिरात रहाणाऱ्या लोकांना श्रमशिबिराबाहेर जायला परवानगी नव्हती.

आम्ही हा कलंक धुवून काढायचा प्रयत्न केला, परंतु आमच्याच देशातील काही राज्यांनी स्वातंत्र्यानंतर हॅबीच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट (गुन्हेगारीची सवय असणाऱ्यांसाठी कायदा) पारित केला. हे आमच्या ध्यानात आले तेव्हा आम्हाला असे वाटले की, ब्रिटीश राजसत्तेचा पश्चात परिणाम पुन्हा आमच्यात उतरला आहे. आम्हाला या कायद्याची गरज काय? आमच्याकडे फौजदारी कायदा, दंडविधान कायदा हे कायदे आहेत.

**अध्यक्ष (श्री. देवेंद्र प्रसाद यादव) :** कृपया आपले भाषण संपवा.

**श्री. अधीर चौधरी (बेहरामपूर, पश्चिम बंगाल) :** मी फक्त पाच मिनिटे घेतली आहेत.

**अध्यक्ष :** पण माझ्याकडे मोठी यादी आहे. आतापर्यंत आपण या विषयावर ३० मिनिटे घेतली आहेत.

**श्री. अधीर चौधरी :** महोदय, विविध राज्यांमधील भटक्या व विमुक्त जातींच्या वर्गवारीमध्ये अद्यापही काही गंभीर चुका आहेत. मी त्याची माहिती देतो. बंजारा समाजाला उत्तरप्रदेशामध्ये इतर मागासवर्गीयांमध्ये वर्गीकृत केले आहे. परंतु आंध्रप्रदेशमध्ये त्यांचे वर्गीकरण अनुसूचित जमाती म्हणून केले गेले आहे. कर्नाटकात अनुसूचित जाती म्हणून केले आहे. तर महाराष्ट्र व तामिळनाडू येथे विमुक्त जाती म्हणून केले आहे. बदर या जातीचे उत्तरप्रदेशामध्ये इतर मागासवर्गीय असे वर्गीकरण केले आहे, पण बंगालमध्ये अनुसूचित जमाती म्हणून व महाराष्ट्र व तामिळनाडूमध्ये विमुक्त जाती म्हणून केले आहे. माझ्याकडे अशी अनेक उदाहरणे आहेत.

आपले माननीय मंत्री देशात सामाजिक बदल घडवून आणण्यास अत्यंत सक्षम आहेत याची मला खात्री आहे. कारण त्यांनी "समाजाचे ऋण फेडा" अशी घोषणा केली आहे व मी त्यांची स्तुती व कदर करतो. त्यांच्यामार्फत मी सरकारला अशी विनंती करतो की, अशा तऱ्हेच्या त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. अशा लोकांचे (भटक्या व विमुक्त) वर्गीकरण वेगळ्या वर्गात केले पाहिजे. भारत सरकारने त्यांनाही अनुसूचित जाती व जमाती सारख्या सुविधा व कल्याणकारी उपाययोजना दिल्या पाहिजेत.

जनपीठ पारितोषिक विजेत्या महाश्वेता देवी यांनी दिलेली माहिती मी तुम्हाला देतो. त्यांनी बराच काळ देशभरातल्या आदिवासी लोकांबरोबर कार्य केले आहे. बंगाल हे त्यांचे मूळ राज्य असे त्या म्हणतात. १९७७ मध्ये तेथे तीन विमुक्त जाती होत्या. लोध, खेरीया, साबर. पश्चिम बंगालमध्ये विमुक्त जातीच्या लोकांचे खून करणे ही नेहमीची बाब झाली आहे. १९७९ ते १९८२ या काळात ४२ लोध आदिवासी व्यक्तींना (विमुक्त जातीच्या) लोकसमुदायांनी ठार मारले. त्या ४२ व्यक्तींना गुन्हे केले होते म्हणून नव्हे तर त्यांचा जन्म लोध या जातीत झाला म्हणून देशाच्या अनेक भागात अजूनही लोध ही जमात गुन्हेगार समजली जाते. त्यात पश्चिम बंगालचाही समावेश आहे. पश्चिम बंगालमधील सबर जातीचे लोक आयुष्यभर भुके कंगाल असतात. १९६० ते १९९८ या काळात ५० पेक्षा जास्त खेरीया सबर जातीच्या व्यक्तींना पोलिसांची मारहाण व लोकसमुदायाकडून मारहाण यामुळे मृत्यू आला. यातील एकाही बाबतीत पोलिसांनी काहीही कृती केली नाही.

फेब्रुवारी १९९८ मध्ये बुधन सबर याला पोलिसांनी छळले व तुरुंगात नेले. तेथे त्यांचा मृत्यू झाला. १९९८ मध्ये बारामती (महाराष्ट्र) येथे पिन्या हरी काळे याला पोलिस कोठडीत ठार मारले गेले. तो पारधी या विमुक्त जातीचा होता. १९९८ मध्ये हेडोकी गावात (उस्मानाबाद जिल्हा, महाराष्ट्र राज्य) एका पारधी स्त्रीवर बलात्कार झाला व तिच्या नवऱ्याचे लैंगिक अवयव चिरडण्यात आले.

ऑगस्ट १९९८ मध्ये महाराष्ट्रामध्ये रेल्वे पोलिसांनी डिकसळ येथे पारधी स्त्रियांच्या एका गटावर हल्ला केला व त्यात एका गरोदर स्त्रीच्या पोटावर लाथा मारल्याने तिचा गर्भपात झाला. ऑगस्ट १९९८ मध्ये

देने जातीच्या (भटकी जात) मुलीसाठी वसतीगृह चालवणाऱ्या अलीस गर्ग नावाच्या समाजकार्यकर्त्या स्त्रीवर राजस्थान सरकारने अन्याय केला. १९९८ मध्ये अहमदाबादच्या छारा समाजाचा राजा राठोड मुंबईला गेला होता. त्याला रेल्वे पोलिसांनी तुरुंगात टाकले व त्याचा मृत्यू झाला. त्याचा कोणताही तपशील उपलब्ध नाही. १९९८ मध्ये बडौदामध्ये बंजारा या विमुक्त समाजातील व्यक्तींना चोरीच्या गुन्ह्याबद्दल ठार मारले. यावरुन असे दिसते की, अजूनही हे गरीब व अरक्षित, असहाय्य लोक अत्याचार व छळ याचे बळी पडत आहेत.

आपण अनुसूचित जाती व जमातींना अत्याचारापासून वाचवण्यासाठी कायदा केला आहे. भटक्या विमुक्त जातीतील लोक त्यांच्या सारखीच भाषा बोलतात. त्यांची संस्कृती व उदरनिर्वाहाची साधने ही अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांसारखी आहे. परंतु अनेक तऱ्हेचा भेदभाव अद्यापही चालू आहे. रेणके आयोगाने या भटक्या व विमुक्त जमातीच्या लोकांचे रक्षण करण्यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी भारतात शिल्लक असलेल्या भटक्या व विमुक्त जातींच्या लोकांची माहिती घ्यावी.

दुपारी ४ वाजून २७ मिनिटे

**श्री. पी.एस.गढवी (कच्छ) :** महोदय, मी माननीय हरीभाऊ राठोड यांनी केलेल्या प्रस्तावाचे समर्थन करतो. त्याचा तपशील आधीच दिला गेला आहे म्हणून तो मी पुन्हा देत नाही. मी असे सादर करु इच्छितो की गुजरातमध्ये १२ विमुक्त जाती आहेत. बाफन, छारा, डफर,हिंगोरा, मे, मियाना, सांधी, थंबा, वाघेर, वाघेरी, चुवालिया, कोळी ह्यांची स्थिती अत्यंत वाईट आहे. गुजरातमध्ये अनेक भटक्या जमाती आहेत. जसे बजानिया, बाजीगर, भांड, नट बजानिया, गासडी, काथोडी, नाथ, नाथबाबा, कोतवालीया, कोतविल तुरी, विठोलिया, वादी, जांगीवादी, वनसफोडा, बावावैरा, बैरागीबाबा, भवनिया, तरगाळा, गारो, गरोडा इत्यादी.

(श्री. अर्जुन सेठी अध्यक्ष पदावर येतात)

आजही जोगी, भांपा, गाडी लहुरिया, गडालिया, गडलिय कंगसिया, कागासिमा, घंटीया, गारिया, नतादा, चमता, चमाथा, चरण-गढवी, सलत घेरा या जातीची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. माननीय मंत्र्यांना हे माहिती असेलच की भटक्या जातीचे लोक डोंगराळ भागात रहात होते व त्यांचा मुख्य व्यवसाय गुरे पाळणे हा होता. पण त्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यांचा शैक्षणिक दर्जा अत्यंत खालावलेला आहे.

माननीय मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी मा. सदस्य श्री. हरीभाऊ राठोड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार करावा. विमुक्त व भटक्या जातींनी फार सहन केले आहे, त्यांना संरक्षण द्यावे व त्यांची स्थिती सुधारावी.

**श्री. शैलेंद्र कुमार (बायल) :** श्री. हरीभाऊ राठोड यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्याची संधी दिली. याबद्दल मी आपला फार आभारी आहे. ज्या जनजातीयांच्या बाबतीत अधिसूचना काढली गेली, त्यांच्या समग्र विकासासाठी या सभागृहाने कायदा पारित करावा यासाठी चर्चा होत आहे. माननीय श्री. राठोडजी यांनी सर्व जातींबाबत सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे भटक्या व विमुक्त जातींच्या जवळजवळ ४०० जाती आहेत. माझ्या मते ही संख्या जास्त आहे. केंद्र सरकार किंवा राज्य सरकारांनी त्यांची गणना अद्याप केली नाही, त्यांचे सर्वेक्षण केले नाही. या जातीचे लोक शहरात, मोठ्या महानगरात, जंगलात, देशाच्या कानाकोपऱ्यात, ग्रामीण क्षेत्रात, वनक्षेत्रात भटकत असतात व आपल्याला वेळोवेळी भेटत असतात. केंद्र सरकारांनी वा राज्य सरकारांनी त्यांचे सर्वेक्षण केले नाही. या जातींची परिस्थिती प्रत्येक राज्यात निरनिराळी आहे. काही राज्यात या जाती अनुसूचित जातीत येऊ इच्छितात, काही राज्यात अनुसूचित जमातीत, काही राज्यात मागासवर्गीयात येऊ इच्छितात. एका जातीच्या १५-२० किंवा २५ उपजाती असतात. त्यांना शोधणे फारच अवघड जाते.

येथे फक्त बंजारा व यायावर (बिगारी) जनजातींच्या लोकांबाबत चर्चा चालली आहे. आमच्याकडे जास्त करुन अलाहाबाद, जनपद कौसंबीमध्ये, प्रतापगड, फत्तेपूर, अशा अनेक जागी पाहिले तर असे अनेक जातीचे लोक आहेत. त्यांचे काम केवळ दगड फोडणे हे आहे. असे लोक जंगलात डोंगराळ भागात दगड फोडून आपले उदरनिर्वाह करतात. यांच्या खूप उपजाती आहेत. अशा तऱ्हेने सर्व ठिकाणची परिस्थिती,स्थिती, भौगोलिक स्थिती वेगवेगळी आहे. अशा जातीत अनेक उपजाती आढळतात. विविध सरकारांनी यांना काय स्थान दिले आहे? त्यांच्या विकासासाठी काय केले आहे? आर्थिक विकासासाठी काय केले आहे? प्रत्येक राज्यात परिस्थिती निराळी आहे. आमच्या उत्तर प्रदेशात दोन-दोन तीन-तीन प्रस्ताव आले. जसे केवट, निषाद, मल्लाह विद प्रजापती अशा अनेक जाती आहेत. विधानसभेत प्रस्ताव मंजूर झाले, केंद्र सरकारकडे हे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहेत. यांना अनुसूचित यादीत समाविष्ट करण्याचा विचार आहे. या जातींचा सविस्तर विचार केला तर असे लक्षात येईल की, त्यांची परिस्थिती, आर्थिक स्थिती, शैक्षणिक आधार अंत्यत वाईट व दयनीय आहे. समाजापासून विमुक्त झालेल्या अनेक जाती आहेत, त्यांना ही तसेच वाटते. केंद्र सरकार काय, राज्य सरकार काय, यांच्या योजनांवर कोणी अंमलबजावणी करीत नाही, त्यांच्यावर लक्ष देत नाही, त्यांची लोकसंख्या घेत नाही, त्यांच्या मुलांची परिस्थिती वाईट आहे.

राठोडजींनी सांगितल्याप्रमाणे अनेक जाती अशा आहेत की, त्यांच्या डोक्यावर छत्र नाही, रहायला घर नाही, मुलांची स्थिती अत्यंत वाईट आहे. यात भीक मागणाऱ्या जाती आहेत, भटक्यांच्या जाती आहेत, वंजाऱ्यांच्या जाती आहेत, वेळोवेळी ते आपल्याला वस्तू घेऊन गटागटांत कोठेही एकत्र होतात, तिथेच आपले खाणेपिणे करतात, दोन चार दिवस रहातात, तिथेच काम मिळाले, रोजगार मिळाला तर करतात व नंतर पळून

जातात. त्यांची एक जागा निश्चित नसते. ते कोणत्या प्रांताचे आहे, वनक्षेत्रातील आहेत की मैदानी प्रदेशातील, शहरातील आहेत का? कोणत्या? काही कळत नाही. कमीत कमी अशा जातींकडे आपण लक्ष दिले पाहिजे. येथे मंत्री महोदय मीरा कुमार बसल्या आहेत. त्या हे दुःख चांगले जाणतात. या सर्व जातींना अनुसूचित जातीत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे. पण त्याकडे काही लक्ष दिले गेले नाही. मी पाहिले की या जातींची इतकी वाईट परिस्थिती असूनही शोधाशोध केल्यावर आपल्याला काही या समाजातील आय.पी.एस. व आय.ए.एस. व्यक्ती आढळतील. त्यांच्याबरोबर आपण बोललात तर ते आपल्याला सांगतील की ते कोणत्या खडतर परिस्थितीतून आले, त्यांची अवस्था कशी वाईट होती, कशा तऱ्हेने ते शिकले व या स्थितीपर्यंत पोहोचले. जर त्यांना शैक्षणिक व सामाजिक आधार दिला (अडथळा) मी संपवत आहे. माझे फक्त एक दोन मुद्दे आहेत. यांच्या परिस्थितीकडे पाहून यांना आधार देणे आवश्यक आहे. तसे केले तर त्यांची खूप प्रगती होईल.

या विधेयकात असा प्रस्ताव आहे की, या जातीतील लोकांना लोकसभा व विधानसभा यामध्ये आरक्षण द्यावे. मी राठोडजींना सांगू इच्छितो की, महिला आरक्षण विधेयक सुद्धा अद्याप प्रलंबित आहे. या जातींचा विचार करणे फार दूरची बाब आहे. सध्या तर आपल्याला हे लोक शैक्षणिक, सामाजिक व सर्व आरक्षण सेवांच्या आधारावर कोणत्या जातीत येतील, कुठे येतील हे ठरवणे, त्यांना घरे देणे, त्यांच्या मुलांची शिक्षणाची व्यवस्था करणे, त्यांच्या आरोग्याची व्यवस्था करणे या गोष्टी पहायला हव्यात, त्यानंतर आपण लोकसभा व विधानसभेमध्ये आरक्षणाचा विचार करु शकतो. आपला विचार चांगला आहे असे मी म्हणतो. मी केंद्र सरकार व विशेषतः मंत्री महोदयांना विनंती करतो की, या जातीचे प्रत्येक राज्यनिहाय सर्वेक्षण करावे मग ती राज्य पूर्वोत्तर असो, मागासलेली राज्ये बिहार, उत्तर प्रदेश, ओरीसा, मध्यप्रदेश असोत. अशा कोणत्या जाती आहेत, जनजाती आहेत की ज्यांची माहिती आपल्या अभिलेखांमध्ये (रेकॉर्डवर) नाहीत व त्यांना संरक्षण कसे द्यावे. त्यांच्या जीवनाचा स्तर व दर्जा कसा वाढवावा याचा विचार करावा. या जातीच्या लोकांना त्यांच्या मागासलेपणाची जाणीव झाली व त्यातील काही तरूण लोक शिकले व नक्षलवादी बनले कारण ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वेगळे झाले. त्यांच्यासाठी काहीच नाही, त्यांचे मतदारांच्या यादीत नावं नाही, रेशनकार्ड नाही, त्यांना रहायला घर नाही, ते निवडणुका लढू शकत नाहीत, समाजात ते वावरु शकत नाहीत, त्यांचे म्हणणे कोणी ऐकत नाही. म्हणून ते नक्षलवादी झाले आहेत. याचा विचार करणे आवश्यक आहे कारण आज जो नक्षलवाद व दहशतवाद फोफावला आहे त्याचे मुख्य कारण हेच आहे. म्हणून सर्वेक्षण करुन त्यांना संरक्षण द्यावे व त्यांचे रहाणीमान सुधारावे. या शब्दांनी मी या संघटनेला जोरदार समर्थन देऊन माझे भाषण संपवतो. धन्यवाद.

(इती)

**श्रीमती अर्चना नायक (केंद्र पाडा) :** बंजारा जातीचा समावेश असलेल्या विमुक्त व भटक्या जातींच्या परिस्थितीबाबतच्या ठरावावर चर्चा करण्यात आपण मला संधी दिलीत याबद्दल मी आपली आभारी आहे. या जातींचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आवश्यक असा ठराव पारित करावा अशी मी सरकारला विनंती करते. या दृष्टीने श्री. हरीभाऊ राठोड यांनी सादर केलेला प्रस्ताव हे योग्य दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. आपल्या घटनेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागासवर्गीयासाठी त्यांच्या कल्याणाची व विकासाची तरतूद आहे. परंतु बंजारासकट अशा अनेक भटक्या व विमुक्त जाती आहेत की ज्यांची सतत भूक, कुपोषण, अत्याचार व पिळवणूक यापासून पीडा होत आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८.४३२ कोटी होती. ही संख्या देशाच्या लोकसंख्येच्या ८.२ टक्के आहे. या जमाती व भटक्या लोकांना शिक्षण व कार्यशिक्षण यातून सबळ करता येईल. जंगलातील खेड्यांचा विकास व तेथील जमीनींचे सिंचन यासाठी अधिक आर्थिक तरतूद केली पाहिजे. तसेच स्वयंसेवी गटांना आर्थिक मदत देऊन विकासाची योजना राबवल्या पाहिजेत. या जातींच्या विकासासाठी कुटुंबाभिमुख अर्थार्जन योजना राबवल्या पाहिजेत. अगदी तळातील आदिवासी जातींचा गटांसाठी व जंगलातील खेडूतांसाठी गटविकास योजनांना प्रोत्साहन दिले पाहिजे. या लोकांचे आयुष्य शिक्षणाद्धारे बदलता येईल म्हणून विमुक्त व भटक्या जातीतील मुलींच्या शिक्षणावर विशेषतः जेथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तिथे जोर दिला पाहिजे. भटक्या व विमुक्त जाती व जमातींच्या शिक्षणासाठी केंद्राने अधिक शिष्यवृत्त्या दिल्या पाहिजेत. विमुक्त जातीच्या गुणवान विद्यार्थ्यांना अभ्यास पुढे चालू ठेवण्यासाठी विशेषतः पदवी मिळवणे व पदव्युत्तर अभ्यास करणे यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

त्यांना सवलतीच्या व्याजदराने मुदत कर्ज व सूक्ष्मकर्ज या स्वरुपात आर्थिक आधार दिला पाहिजे की ज्यायोगे ते अर्थार्जनाचे मार्ग शोधतील. ग्रामीण भागात उत्पादन केलेल्या पदार्थाचे विपणन करण्यासाठी अधिकाधिक ग्रामीण विपणन संस्था देशात निर्माण कराव्यात. जंगलात रहाणाऱ्यांच्या मदतीसाठी अधिकाधिक किरकोळ विक्री केंद्रे व दुकाने निर्माण करावीत.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्क मान्यता) कायदा २००६ या तरतुदींची अंमलबजावणी तातडीने करण्याची वेळ आलेली आहे. (शेड्युल्ड ट्राईब्ज अँड अदर ट्रेडीशनल फोरेस्ट डेवलर्स रेक्नीशन ऑफ फॉरेस्ट राईट्स ॲक्ट) त्याजोगे जंगलात रहाणाऱ्या भटक्या व विमुक्त जातींच्या लोकांच्या जंगलाबाबतच्या हक्कांचे संरक्षण होईल. मी या शब्दात सरकारला विनंती करते की त्यांनी बंजारासह भटक्या व विमुक्त जातींच्या विकासासाठी योग्य असा कायदा पारित करावा.

मी या विधेयकाला संपूर्ण व मनःपूर्वक पाठींबा जाहीर करते व माझे भाषण संपवते.

**श्री. सी.के.चंद्रप्पन (त्रिचूर) :** आमचे मित्र श्री. हरीभाऊ राठोड यांनी हा प्रस्ताव चर्चेला आणल्याबाबत मी त्यांचा आभारी आहे. देशातील लक्षावधी मूक जनतेचा आवाज या माननीय सभागृहाला उठवणारे सांसद म्हणून हरीभाऊ नित्यस्मरणात असतील. या जमाती एका दृष्टीने बाजूला पडलेल्या जमाती आहेत. आपल्या अभिलेखात (रेकॉर्डवर) त्या कोठेच नाहीत, अगदी आपल्या जनगणनेतही नाहीत. आपल्या देशातील इतक्या मोठ्या संख्येने (हरीभाऊंच्या अंदाजानुसार १५ कोटी) असलेल्या लोकांचा अभिलेख आपल्याकडे नसावा, त्यांना सर्व हक्क नाकारले जावेत, ही शरमेची बाब आहे. ते कोठे रहातात, कसे रहातात याबद्दल आम्हाला काही ठाऊक नाही, ही आपल्या लोकशाही देशाला अभिमानास्पद गोष्ट नाही, म्हणूनच मी म्हणतो की श्री. हरीभाऊ राठोड हे या लक्षावधी मूक जनतेचा आवाज या सभागृहात उठवण्यात यशस्वी झाले आहेत.

सदन यांची नोंद घेईल. माननीय मंत्री महोदय येथे आहेत. संसदेने नुकतेच आदिवासींच्या हक्कांबाबत विधेयक पारित केले आहे. ती एक ऐतिहासिक घटना होती. आदिवासींच्या हक्काबाबत वर्षानुवर्षे काही झाले नाही, किमान इतक्या वर्षाने आपण त्याबाबत एक अभिनंदनीय ठराव पारित केला, परंतु त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही असे मी ऐकतो. आता आपल्यापुढे ज्या लोकांना आपण ओळखलेच नाही, मान्य केले नाही, त्यांना मान्य करण्याचा ओळखण्याचा प्रश्न आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सहा दशकांनी आपण त्यांच्या जमिनीचा हक्क, मालमत्तेचा हक्क, रोजगाराचा हक्क व इतर हक्क मान्य केले पाहिजेत.

पण वाघांची लॉबी त्यांच्याविरुद्ध आहे. वाघांची इतकी काळजी लोकांना आहे याचे मला आश्चर्य वाटते. मलाही वाघांची काळजी वाटते. मात्र वाघ हे भारतातल्या आदिवासींपेक्षा महत्वपूर्ण होऊ नयेत. हा अत्यंत अमानवी व असंस्कृत दृष्टीकोन आहे. सरकारने कायदा पारित केल्यानंतर त्यांच्याकडे (आदिवासींकडे) दुर्लक्ष केले आहे. देशातील मोठ्या संख्येने असलेल्या लोकांसाठी या सभागृहाने अत्यंत स्तुत्य ठराव पारित केला आहे. पण सरकार त्यांची अंमलबजावणी करीत नाही याचा मी निषेध करतो.

आणखी एक गोष्ट ध्यानात घ्या. देशात दलित ख्रिश्चन आहेत, दलित मुस्लिम आहेत. त्यांच्या हक्कांच्या बाबतीत चौकशी करण्यासाठी रंगनाथ मिश्रा समितीची स्थापना केली आहे. माझ्या समजुतीनुसारी या समितीने आपला अहवाल व शिफारसी या पूर्वीचे सादर केला आहे. हे कसे वर्णन करावे हेच मला कळत नाही. शांत बसणे ही एक गोष्ट आहे, पण ते (हा अहवाल) लोकांपासून दूर ठेवत आहेत. तो गोपनीय ठेवला आहे. तो या सभागृहात सादर केला गेला नाही. रंगनाथ मिश्रा समितीचा अहवाल काय आहे हे कोणालाच ठाऊक नाही. लक्षावधी लोकांना असे वाटते की त्यांच्यावर होणारा अन्याय व त्यांच्यावरील दडपशाही याचा सामना ते धर्मांतर करुन करु शकतील. अशा लोकांबद्दल तसे झाले नाही. आता ते कोठेच नाहीत, इकडेही नाहीत, तिकडेही नाहीत.

लोकसमाजांच्या प्रत्येक घटकाची दखल घेणे ही लोकशाही सरकारची जबाबदारी आहे. त्यांच्या कायदेशीर अधिकारांना मान्यता मिळाली पाहिजे. येथे हे घडत नाही. जर या लोकांची १५ कोटी ही संख्या बरोबर असेल, तर काहीही केले गेले नाही हे म्हणताना मला खेद होतो. भटक्या विमुक्त व अर्ध भटक्या जमतींसाठी भारत सरकारने नेमलेल्या तांत्रिक सल्लागार समितीचा २००६ सालचा अहवाल इथे आहे. आपण अहवाल फार चांगले करतो. जेव्हा ते वाचनालयात ठेवले जातील तेव्हा आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी अगदी वाचनीय होतील. पण सरकारची जबाबदारी फक्त अहवाल करणे एवढीच नाही.

मी अहवाल चाळला आहे. या जमातींची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व त्यांना शिक्षण व नोकरी यात आरक्षण देण्यासाठी स्वागतार्ह सूचना त्यात आहे. त्यात अत्यंत चांगल्या सूचना आहेत, पण सरकार त्यावर कृती करीत नाही. चर्चेच्या शेवटी मा. मंत्री महोदय माननीय सदस्य (श्री. राठोड) यांचे उत्तम सूचना केल्याबद्दल अभिनंदन करतील व आम्ही सूचनेची नोंद घेतली आहे असे म्हणतील.

माननीय मंत्री महोदया, या सभागृहात आपणी मंत्री असताना पूर्वी चर्चा केलेल्या काही विधेयकांपैकी हे विधेयक एक होते. अनुसूचित जाती व जमातींना खाजगी क्षेत्रात आरक्षण देणेबाबत साडेचार वर्षापूर्वी आपण त्याची चर्चा केली होती. त्यावेळी आपण फार सुंदर उत्तर दिले, "सरकार ही बाब गंभीरपणे घेऊन त्यावर कृती करतील." साडेचार वर्षे झाली. आपल्याला आठवत असेल, अशी मी आशा करतो, पण मंत्र्यांनी लक्षात ठेवले पाहिजे व कृती केली पाहिजे तरच मंत्र्याची जबाबदारी पार पडली असे म्हणता येईल. मला माफ करा, पण सरकारने त्यावर काही कृती केली नाही. मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही, आपण लोकांच्या मोठ्या भागाची चर्चा करीत आहोत. १५ कोटी जे वंचित आहेत, त्यांच्याकडे घर नाही, भूमी नाही, स्वतःचे असे काहीच नाही. किमानपक्षी देशाने हे आपले नागरीक आहेत हे तरी मान्य करावे. ते सुद्धा नाहीत, कारण त्यांची नावे मतदार यादीत नाहीत. ते भटके आहेत जिप्सी आहेत. आपण ही स्थिती स्वतंत्र देशात मान्य करावी.

श्री. हरीभाऊ राठोड यांनी हे विधेयक आणले याबाबत त्यांचे अभिनंदन करतो कारण आज अशा लोकांबाबत आपल्याला निदान कळले तरी व त्यांच्याबाबत चर्चा केली. प्रत्येकाने या विधेयकाला पाठींबा दिला आहे. येथे बोललेल्या शब्दांच्या आधारे या लोकांसाठी सरकार कृती करील अशी मला आशा आहे.

आदरणीय सभापती महोदय आपण अध्यक्ष पदावर आहात त्यामुळे आम्हाला आशा आहे की आपण आपल्या मार्गाने सरकारला अशी कृती करायला सांगाल की, जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीच्या म्हणजेच भारताच्या लोकांच्या एका मोठ्या भागाबाबत लोकशाहीने वर्तन केले नाही असा दोषारोप पुढील पिढ्यांना आपल्याला देऊ नये. धन्यवाद.

दुपारी ४ वाजून ५१ मिनिटे

**श्री. एस.के. खारवेंथन (पलानी) :** माननीय अध्यक्ष महोदय सर्वप्रथम मी आपले सदस्य माननीय श्री. राठोड यांनी विमुक्त व भटक्या जातींच्या कल्याणासाठी हा ठराव आणल्याबाबत त्यांचे अभिनंदन करतो.

महाशय, भारताची राज्यघटना देशातील अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासलेल्या वर्गांना संरक्षण देते. भटक्या व विमुक्त जातींची स्थिती प्रत्येक राज्यात निरनिराळी आहे. काही राज्यांत त्यांना अनुसूचित जाती समजले जाते. काही राज्यात त्यांना इतर मागासवर्गीय समजले जाते. घटनेच्या कलम ३६६(२४), ३६६(२५), ३४१, ३४२ यानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासलेल्या वर्गांच्या हक्कांचे संरक्षण केले गेले आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या ८.४३३ कोटी आहे व ही देशाच्या लोकसंख्येच्या ८.२ टक्के आहे. यापैकी ९१.७ टक्के लोक खेड्यात रहातात ८.३ टक्के नागरी भागात रहातात. तामिळनाडूमध्ये या भटक्या व विमुक्त जातीचे लोक नीलगीरीमध्ये रहातात व माझा मतदार संघ, डींडीगुळ जिल्हा याच्या काही भागात रहातात. त्यांची परिस्थिती अंत्यंत हलाखीची आहे व त्यांना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा अत्यंत दयनीय आहेत. त्यांच्या रहाणीमानाबाबत अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या आयोगानेही या जमातीतील शिकणाऱ्या मुलांनी शिक्षण सोडून देण्याचा दराबाबत लिहिले आहे. अहवालात असे नमूद केले आहे की शिक्षण सोडून देण्याचा दर, शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसल्याचे व या गटाद्वारे शिक्षण पूर्ण करण्याच्या अक्षमतेबाबतचा दर्शक आहे. अनुसूचित जमातींबाबतचा हा दर अधिकच जास्त आहे. हे दर २००४-०५ च्या सर्वेक्षणानुसार आहेत.

कस्तुरबा गांधी पालिका विद्यालय सारख्या निवासी शाळा स्थापण्याची मी सरकारला विनंती करतो. या शाळांमध्ये रहाण्याची व्यवस्था असावी, तेथील विद्यार्थ्यांना पोषाख पुरवावा, उद्योंगाभिमुख प्रशिक्षण द्यावे व रोजगाराची हमी द्यावी, तरच पालक आपली सर्व मुले शाळेत घालतील. योग्य शिक्षणाखेरीज या जातींची प्रगती होणार नाही. आम्ही आमच्या क्षेत्रात या गोष्टी पहात आहोत. तामिळनाडू सरकारने या लोकांच्या कल्याणासाठी काही पाऊले उचलली आहेत. तामिळनाडूचे सध्याचे मुख्यमंत्री डॉ.कलाईग्नर करुणानिधी यांनी १ रुपया किलो या दराने तांदूळ पुरवण्याची योजना लागू केली आहे व ती या गरीब लोकांना अत्यंत उपयुक्त ठरली आहे.

या ठिकाणी मी आणखी एक गोष्ट सांगतो. आमच्या सरकारने विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या लोकांच्या विकासाबाबत अभ्यास करण्यासाठी एका राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली आहे. या आयोगाने आपला अहवाल सादर केला आहे व त्यात या लोकांची स्थिती सुधारण्यासाठी व त्यासाठी घटनादुरुस्ती करण्यासाठी एकूण ७६ सूचना केल्या आहेत. त्यापैकी अत्यंत महत्वाची सूचना म्हणजे राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोगाप्रमाणेच विमुक्त व भटक्या लोकांसाठी एक स्थायी स्वरुपाचा एक आयोग स्थापन करणे. या ७६ सूचनांपैकी ६६ वी व

महत्वाची सूचना म्हणजे विमुक्त व भटक्या जमातींसाठी घटनेनुसार आरक्षणाची मर्यादा ५० टक्के पेक्षा जास्त झाली तरीही त्यांना शासकीय नोकरीत १० टक्के आरक्षण देणे. आता दिरंगाई न करता या सूचनांची अंमलबजावणी करावी. आमच्या सरकारने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ६० वर्षांनी इंदिरा गांधी आदिवासी तंत्रविद्यापीठ स्थापन केले आहे. ही मोठी बाब आहे. आम्ही आदिवासींसाठी ठराव पारित केला आहे.

मानीनीय सदस्य चंद्रप्पन यांनी दलित ख्रिश्चनांचा उल्लेख केला. माझ्या मतदार संघात किमान दोन लाख दलित ख्रिश्चन आहेत व ते डोंगराळ भागात रहातात. त्यांना किमान शालेय शिक्षण व नोकऱ्या दिल्या पाहिजेत. त्यांनी जरी ख्रिश्चन धर्मात प्रवेश केला तरी त्यांच्या हक्काचे रक्षण झाले पाहिजे. त्यांना अनुसूचित जमातींचे सदस्य म्हणून शिक्षण पुढे चालू ठेवण्याला अनुमती मिळाली पाहिजे.

मी आपल्या निदर्शनाला असे आणू इच्छितो की, जरी आम्ही आदिवासी विधेयक पारित केले असले तरीही डोंगराळ भागात रहाणाऱ्यांना वनातले लोक जमीन नांगरु देत नाहीत. शेते पिकवू देत नाहीत. म्हणून डोंगराळ भागात रहाणाऱ्यांचे योग्य संरक्षण केले पाहिजे. त्यासाठी सरकारने योग्य पावले उचलली पाहिजेत.

माननीय  सदस्य श्री. हरीभाऊ राठोड यांनी डोंगराळ विभागात रहाणाऱ्या दुबळ्या लोकांच्या कल्याणासाठी विधेयक सादर केल्यामुळे त्यांचे मी पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

**श्री. सभापती (श्री. अर्जुन सेठी) :** माननीय सदस्य हो, या प्रस्तावावर अजूनही बऱ्याचशा सदस्यांना बोलायचे आहे. वेळ फारच मर्यादित आहे, म्हणून मी आपल्याला अशी विनंती करतो की प्रत्येकाने आपले भाषण फक्त पाच मिनिटांमध्ये संपवावे.

**श्री. किंडारापू येरेननायडू (सिरिकाकुलम) :** मा. महोदय कृपया माननीय मंत्री महोदयांना आपण विनंती करावी की त्यांनी या प्रस्तावावर उत्तर द्यावे की ज्यायोगे पुढचा महत्वाचा ठराव आजच घेता येईल. (व्यत्यय)

अध्यक्ष, ठीक आहे. मी काहीतरी व्यवस्था करतो की, जेणेकरुन आपण पुढचा प्रस्ताव घेऊ शकतो.

**श्री. किंजारापू येरेनायडू (श्रीकाकूलम) :** पुढील प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे. (व्यत्यय)

**अध्यक्ष :** कृपया खाली बसा. पुढील प्रस्ताव आजच घेण्यासाठी व्यवस्था करण्याची मला विनंती करण्यात आली आहे, म्हणून मी सर्व माननीय सदस्यांना पुन्हा एकदा विनंती करतो की, त्यांना आपली भाषणे पाच मिनिटात आटोपण्याची विनंती करतो की, ज्या मागे आपण चर्चा पूर्ण करुन पुढील प्रस्ताव आजच चर्चेला घेऊ शकू. पुढील प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे व आंध्रप्रदेशचे बरेच सभासद येथे बसले आहेत.

आता श्रीमती तेजस्वीनी गोवडा

दुपारी ५ वाजून ०६ मिनिटे

**श्रीमती तेजस्वीनी गोवडा (मनकपूर)** : महोदय, श्री. हरीभाऊ राठोड यांनी हा महत्वाचा प्रस्ताव या सदनासमोर आणल्याबाबत मी त्यांचे आभार मानते.

सामाज्यवादी सत्तेविरुद्ध लढा देताना हौतात्म्य पत्करलेल्या बिसरा मुंडासारख्या अनेक स्वातंत्र्यवीरांना मी अत्यंत जड अंतःकरणाने आदरांजली वाहते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ६० वर्षांनी सुद्धा ते कोणत्या दुखःद परिस्थितीमध्ये जगत आहेत, याची आपल्याला चर्चा करावी लागते. अत्यंत वेदनादायक आहे. त्यांनाही आपल्या सारखेच जगण्याचा हक्क आहे. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान दिले आहे.

बंजारासहित भटक्या व विमुक्त जातींच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रस्ताव सादर केला आहे. (अ) या प्रस्तावात सरकारला पुढील गोष्टींसाठी आवश्यक कायदा पारित करण्याची विनंती केली आहे. या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हित जोपासणे, (ब) राज्यांच्या सेवांमध्ये आरक्षण, (क) राज्यविधान सभा व लोकसभेमध्ये आरक्षण.

येथे रामायणातील एक गोष्ट आठवणे उचित ठरेल. आपण आदिवासींना विसरु शकत नाही. आदिवासी लोक या देशाचे मूळवासी होते, ते आपल्या पुराणांचे उद्गमस्थान आहेत. चित्रकूट (छत्तीसगड राज्य) येथे मोठ्या संख्येने आदिवासी राहतात. येथून सीतेचे अपहरण झाले तेव्हा या मूळवासी व निष्ठावान आदिवासींनी सीतेचा शोध घेण्यासाठी रामाला मदत केली. इतकेच नव्हे तर जटायू पक्षाने रावण सीतेला पळवत असताना त्याला अडवायचा प्रयत्न केला. माझे म्हणणे असे की, आदिवासी लोक निसर्गाची अपत्ये आहेत. त्यांना भिन्नेपणा ठाऊक नाही. आजही ते निसर्गाशी पारंपारिक भावनिक बंध टिकवून तसेच रहात आहेत व ते जंगलाशी एकनिष्ठ आहेत. त्याना योग्य तऱ्हेने शिक्षण मिळाले पाहिजे. आज तेथे खूप लोक आहेत पण योग्य तऱ्हेच्या शाळा नाहीत. शाळा असल्या तरीही योग्य तऱ्हेचे शिक्षक नाहीत. आदिवासी लोक राहतात त्या ठिकाणी शिक्षक जाऊ इच्छित नाहीत म्हणून आपण आदिवासींना उत्तम दर्जाचे शिक्षण, उत्तम पायाभूत सुविधा, पेयजल सुविधा पुरविल्या पाहिजेत. त्यांच्या मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आपण आदिवासींना त्यांच्या हक्काची व इतर गोष्टींची जाणीव करुन दिली पाहिजे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ६० वर्षानंतर सुद्धा त्यांना घटनेने दिलेल्या हक्कांची माहिती नाही. आपण त्यांना रोजगाराभिमुख शिक्षण व माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण दिले पाहिजे. हे पाठ्यक्रम ते इंग्रजीत शिकू शकत नाहीत. प्रत्येक राज्यसरकारने त्यांना हे शिक्षण त्यांच्या मातृभाषेत घेण्यास सवलत दिले पाहिजे. आपण त्यांना इतरांमध्ये मिसळण्यासाठी सवलत देऊ शकतो.

या सार्वभौम देशामध्ये त्यांना जमिनीशी संबंधित कामे दिली पाहिजेत. ती जंगलाचीच मुले आहेत. त्यांना त्या वातावरणात कसे जगायचे व तेथे काय करायचे हे चांगले माहिती आहे. तसेच वातावरणातील बदलही महत्वाचा आहे. आज वातावरणातील बदलाबद्दल आपण बरेच बोलत आहोत. हे सूर्य, चंद्र,पाणी व झाडे यांची पूजा

करणारे लोक आहेत. ही निसर्गाची मुले आहेत. आपण वातावरणातील बदल टिकवण्यासाठी त्यांचा वापर का करु नये? त्यांना चांगली भाषा येत नसेल पण त्यांना नैसर्गिक स्त्रोतांची व वातावरणातील बदल टिकवण्याची चांगली माहिती आहे. वन्य प्राण्यांचे संरक्षण, जंगलाचे संरक्षण या कामासाठी हे लोक योग्य आहेत. याद्वारे आपण अनेक रोजगार निर्माण करु शकू. ते सुदृढ बांध्याचे आहेत, त्यांच्यात खूप उर्जा आहे व ते कार्यकुशल आहेत. आपण त्यांच्यातील चांगली मुले शोधून त्यांना प्रशिक्षण का देऊ नये? त्यांना चांगले प्रशिक्षण देऊन आपण त्यांना क्रीडा क्षेत्रातील रोजगार देऊ शकू.

माझ्या कर्नाटक राज्यामध्ये ३० लाखपेक्षा जास्त आदिवासी लोक आहेत. कर्नाटकच्या २९ जिल्ह्यांपैकी ११ जिल्ह्यात एकून अंदाजे ३,५०,००० आदिवासी लोक आहेत. परंतु विमुक्त व भटक्या जातीच्या लोकांना सुशिक्षित जातींनी कोंडीत पकडले आहे. कूर्म, दक्षिण कन्नड, चिकमंगलूर, म्हैसूर, रामनगर, (माझा स्वतःचा जिल्हा) , बँगलोर नागरी, उत्तर कन्नड, हसन, उडुपी, मंड्या या ११ जिल्ह्यात ३,५०,००० पेक्षा जास्त आदिवासी आहेत. जरी आम्ही २००६ साली वन आदिवासी कायदा (ट्रायबल फॉरेस्ट ॲक्ट) पारित केला असला तो अनेक खेड्यात अजून योग्य तऱ्हेने अमलात आणला नाही. हा कायदा अमलात आणताना अनेक पळवाटा आहेत. या कायद्याचा फायदा गरजू व लायक व्यक्तींनाच मिळाला पाहिजे याची आपण खात्री करणे आवश्यक आहे.

लोकसभा व राज्यविधानसभा यामध्ये आदिवासींना आरक्षण देण्याबाबत मी काही बोलू इच्छितो. एक उदाहरण देतो, कर्नाटकात ३० लाख लोकसंख्येच्या आधारे आदिवासींसाठी १५ जागा आरक्षित केल्या होत्या, पण एकही मूळ आदिवासी विधानसभेत पोचू शकला नाही. इतर लोकांनीच परिस्थितीचा फायदा उठवला व आदिवासी लोक विधानसभेत पोहचले नाहीत, म्हणून मूळ आदिवासी त्यांना आंबटीत केलेल्या जागांवर विधानसभेत पोहोचतील याची आपण खात्री केली पाहिजे. १५ वर्षापूर्वी श्रीमती जाजी नावाची महिला जिल्हा परिषदेवर निवडून गेली होती. ती मूळ आदिवासी होती. तिने विधानसभेसाठी सुद्धा प्रयत्न केले होते, परंतु तिला जागा मिळाली नाही. तिला ही जागा मिळावी म्हणून मी माझ्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांच्यामार्फत प्रयत्न केला. परंतु या पुरुष प्रधान समाजात त्या महिलेला विधानसभेत जागा मिळवून देऊ शकलो नाही. असो, आम्ही महिलांना जागा मिळवून देण्यासाठी लढा देत राहू, विशेषतः दुर्लक्षित महिलांना त्यासाठी सभापती महोदयांचा पाठिंबा असेल. आपण आदिवासींना न्याय दिला पाहिजे. परिस्थिती गंभीर आहे व त्यांनी बंड करण्याआधी घटनेने त्यांना दिलेले मूलभूत हक्क आपण त्यांना दिले पाहिजे. मी माझे भाषण संपवतो. धन्यवाद.

**अध्यक्ष श्री. अर्जुनचरण सेठी** : माननीय सदस्यहो, माझ्याकडे सहा नावे आहेत. जर कोणी माननीय सदस्य आपले भाषण सदनाला सादर करु इच्छित असेल, तर त्यांनी तसे करावे.

दुपारी ५ वाजून २० मिनिटे

**श्रीमती कल्पना रमेश नरहिरे (उस्मानाबाद) :** महाशय, मी आपली आभारी आहे. माननीय श्री. हरीभाऊ राठोड यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. महाशय, आमच्या महाराष्ट्रात पारधी, बंजारा, हिसाडी, मसण, जोगी, गोसावी, मदारी इत्यादी वेगवेगळ्या जातीचे लोक रहातात. हे लोक गावाबाहेर ताडावाडीत रहातात, म्हणून त्यांना सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सवलतींपैकी कोणतीही सवलत मिळत नाही. महाराष्ट्रात, विशेषतः मराठवाड्यातील वंजारी व पारधी लोक साखर कारखान्यात ऊस तोडण्याचे काम करतात, म्हणून ते एका जागी रहात नाहीत. त्यांना निरनिराळ्या साखर कारखान्यात काम करावे लागते. त्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नाही. त्यांच्या बायकांना कोणतीही सुविधा मिळत नाही.महाराष्ट्र सरकारने साखर कारखान्यांजवळ शाळा उघडल्या आहेत. परंतु या लोकांच्या मुलांना कोणतीही सुविधा मिळत नाही, त्यामुळे ते शिक्षणापासून वंचित राहतात.

आमच्याकडे मसणजोगी नावाची एक जात आहे. या जमातीचे लोक गावागावांत जाऊन गाणे म्हणून लोकांना उठवतात. त्यानंतर दिवसभर हे स्मशानभूमी व इतर ठिकाणी असतात. णी ज्यावेळी लोकसभेच्या निवडणुकीला उभी राहिले होते, तेव्हा तांदावाडी इत्यादी जागी त्यांची मते मागायला गेले होते. तेव्हा त्यांनी आपल्या समस्या आम्हाला सांगितल्या. आम्ही त्यांच्या समस्या खासदार निधीतून पुरवायचा प्रयत्न करतो, पण पुरेसा निधी नसल्याने ते शक्य होत नाही. म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी त्यांना सुविधा पुरवणे आवश्यक आहे. श्री. हरीभाऊ राठोड यांनी जो प्रस्ताव सादर केला आहे, त्याला मी पाठिंबा देते.

दुपारी ५ वाजून २६ मिनिटे

**प्रा.रासासिंह रावत (अजमेर) :** अध्यक्ष महाशय, माननीय श्री. हरीभाऊ राठोड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. त्यांनी असा प्रस्ताव सादर केला आहे की "अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या जनजाती व वंजाऱ्यासकट यायावर (बिगारी) जनजातींयाशी संलग्न व्यक्तींच्या दुर्दशेबाबत हे सरकार चिंता व्यक्त करत आहे व सरकारला विनंती करते की, सदर आर्थिक हितसंबंधीचे संरक्षण करण्यासाठी, राज्याच्या अधिन असलेल्या सेवांमध्ये पदांच्या आरक्षणासाठी लोकसभा व राज्यसभा विधेयक सरकारने आणावे व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पावले उचलावीत." माझ्या मते हा सर्वांगीण प्रस्ताव आहे. यामध्ये सर्व गोष्टी आल्या आहेत. ज्या भटक्या जाती आहेत, यायावर (बिगारी) जाती आहेत, त्यांच्या कल्याणासाठी खास प्रयत्न करणे आवश्यक आहे. मी माननीय सदस्यांना धन्यवाद देतो कारण एक म्हण आहे, "माया से माया मिले, कर कर लंबे हाथ, तुलसी दास गरीब की पूछे नाही कोई बात" (श्रीमंत लोक एकमेकांना सहकार्य करुन अधिक श्रीमंत होतात, पण गरीबाला कोणीही विचारत नाहीत – संत तुलसीदास) या दोह्यात तुलसीदासांनी खऱ्या अर्थांनी गरीबाकडे वेधून घेतले आहे. शहरे, गावे येथे रहाणाऱ्या जातींकडे सर्वांचे लक्ष असते, जंगलात रहाणाऱ्या आदिवासींकडे सर्वांचे लक्ष आहे, पण शहरे व गावे यांच्याजवळ तंबू ठोकून त्यात रहाणाऱ्या या गरीब लोकांना कोणीही विचारत नाही. ते सकाळी एका ठिकाणी, दुपारी दुसऱ्या ठिकाणी, दुसऱ्या दिवशी वेगळ्या ठिकाणी रहातात व कसेतरी जगतात. कधी मदारीचा खेळ, कधी चिक्की इत्यादी विकणे किंवा आपल्या गाडीवर सामान लादून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेणे ही कामे हे लोक करतात. यांच्याकडे फारच थोड्या लोकांचे लक्ष जाते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला व २६ जानेवारी १९५० रोजी सार्वभौम प्रजासत्ताक झाला. त्यावेळी आपली राज्यघटना लागू झाली व अनेक कल्याणकारी कायदे केले गेले. परंतु मला सांगताना दुःख होते की, ६१ वर्षानंतरही या बिगारी जातींची स्थिती अत्यंत वाईट आहे. मी स्वतः गावागावात जातो व जिथे राहतो त्या जागेजवळ या लोकांचा तंबू असतो. त्यांची स्थिती व जेवण पाहून दया येते. सर्व सुविधांपासून वंचित आहेत. ते भीक मागायला येतात किंवा सारंगी वाजवून, काही गाणी म्हणून पोट भरण्याचा प्रयत्न करतात. राजस्थानमध्ये गडरिया लोहार लोखंडाचे काम करतात, त्यांनी महाराणा प्रतापच्या काळात प्रतिज्ञा केली होती की, जोपर्यंत भारत स्वतंत्र होत नाही, तोपर्यंत आम्ही चितोडमध्ये प्रवेश करणार नाही व गावात स्थिर होणार नाही. तेव्हापासून ते गाडीतच आपली वस्ती करतात. आपले पहिले प्रधानमंत्री श्री. जवाहरलाल नेहरू यांनी चितोडमध्ये जाऊन त्यांनी स्थिर व्हावे यासाठी मोठा मेळावा आयोजित केला होता व त्यांनी सांगितले की आता भारत स्वतंत्र झाला आहे. परंतु त्या लोकांमध्ये अज्ञान आहे, शिक्षण नाही, ते घरात न रहाता गाडीमध्ये

रहातात, त्यांचे जन्म-मरण गाडीतच होते. ते एका गावातून दुसऱ्या गावात जातात, शेतीसाठी उपयोगी पडणारी अवजारे तयार करतात. अशा जातींकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

**सभापती (अर्जुन सेठी)** : वेळेची मर्यादा आहे. आता आपण आपले भाषण संपवावे. मंत्री महोदया आता बोलतील आणि दुसरा प्रस्ताव मांडायचा आहे.

**प्रा. रासासिंह रावत (अजमेर)** : महाशय आम्ही आपली संवेदनशीलता जाणतो. भारतातील ज्या भटक्या जाती आहेत, जशा बावरी, कंजर, सांसी. त्यातील कंजर व सांसी जातीच्या चार-पाच वस्त्या अजमेरमध्ये आहेत, पण शिक्षण नसल्याने ते दारू गाळतात. पोलिस आल्यावर ४०-५० ड्रम दारु पसरते व घाण वास येतो. हे लोक कल्याणकारी योजनांपासून वंचित राहिले, घरापासून वंचित राहिले. त्यामुळे त्यांच्यात ही गुन्हेगारी प्रवृत्ती आली आहे. त्यांना समाजाच्या मुख्य धारेत आणण्याचा प्रयत्नच केला गेला नाही. येथे मीराकुमारीजी उपस्थित आहेत. त्यांचे सामाजिक न्याय मंत्रालय अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकांसाठी खूप प्रयत्न करीत आहेत. आदिवासींच्या विकासासाठी सुद्धा खूप प्रयत्न करीत आहे. तसेच त्यांनी बिगारी (यायावरी) जातींच्या शिक्षणाकडे, रहाण्याच्या घरांकडे लक्ष द्यावे. या जाती सर्व तऱ्हेच्या सुविधांपासून वंचित आहेत. त्यांनाही अधिकार मिळाले पाहिजेत, त्यांनीही मतदान करावे. स्वतंत्र भारतात एका ठिकाणी स्थिर राहून सुखसुविधा मिळवाव्यात. त्यांच्या मुलांसाठी फिरत्या शाळा असाव्यात की, ज्यायोगे ते कुठेही राहिले तरी त्यांची मुले शिकतील. त्यांनी इतर व्यवसाय सुद्धा प्रयत्न करावेत. त्यांचे जे परांपरागत व्यवसाय आहेत त्यानुसार त्यांची प्रगती करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितच ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकतील, मग ते रबारी असोत, रामास्वामी असोत, कालवेलिए असोत. अध्यक्ष महोदय हे लोक सकाळी येऊन लोकांना त्यांचे भविष्य सांगतात. पण त्यांचे स्वतःचे भविष्य किती अंधारात आहे हे इतरांपासून लपून राहिले नाही. मी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करतो की आता माननीय श्री. राठोड साहेबांनी लक्ष वेधले आहेच तर आतातरी या भटक्या जातींकडे लक्ष द्यावे व आपल्या आधुनिक कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न करावा. राजाचे आणि कल्याणकारी राज्याचे कर्तव्य असे आहे, "मुखीया मुखसे चाहिए, खानपान एक पाले, पोसे, सब संग तुलसी दंग विवेक" (ज्या प्रमाणे तोंड अन्न ग्रहण करुन सर्व शरीराचे पोषण करते, तसे राजाने किंवा सरकारने विवेकपूर्ण पद्धतीने सर्व जनतेचे पोषण केले पाहिजे-संत तुलसीदास). म्हणजेच सरकारने सर्व जनतेचे कल्याण केले पाहिजे. जर समाजाच्या प्रत्येक भागाचा विकास झाला तरच सर्वांगीण विकास झाला असे म्हणता येईल. जर फक्त थोड्याच लोकांचा विकास झाला, श्रीमंत अधिक श्रीमंत झाले व गरीब गरीबच राहिले व विषमता निर्माण झाली तर ती समाजासाठी वाईट आहे. मी आपल्यामार्फत सरकारला अशी विनंती करतो की बिगारी जातींसाठी त्यांनी खास पाऊले उचलावीत. धन्यवाद.

**अध्यक्ष (श्री. अर्जुन सेठी) :** माननीय सदस्यहो, या प्रस्तावासाठी ठरवलेली वेळ संपली आहे. या प्रस्तावावर अजूनही काही सदस्यांना बोलायचे आहे. जर सभागृहाची मान्यता असेल तर मी या प्रस्तावासाठी अजून अर्धातास वेळ वाढवेन.

**काही सदस्य :** कृपया वेळ वाढवा.

**अध्यक्ष :** आता मी या प्रस्तावाची चर्चा करण्यासाठी अर्धातास वेळ वाढवतो.

**प्रोफेसर एम. रामदास (पाँडेचेरी)** : माननीय अध्यक्ष, श्री. हरीभाऊ राठोड यांनी विमुक्त व भटक्या जातीच्या लोकांच्या कल्याणासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी-मांडलेल्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो. या लोकांची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती किती दयनीय व वाईट आहे हे सांगून मी सभागृहाची वेळ वाया घालवू इच्छित नाही. या लोकांची परिस्थिती कशी सुधारायची व त्यांना पुढे कसे आणायचे यासाठी माननीय सदस्यांनी अनेक सूचनाही केलेल्या आहेत, तेव्हा मी त्यावर वेळ न घालवता पाँडेचेरी (केंद्रशासित प्रदेश) मधील काही आदिवासी लोकांची स्थिती कशी दयनीय आहे याकडे अध्यक्षांचे लक्ष वेधतो. पाँडेचेरी ही पूर्वी फ्रेंच वसाहत होती. ती १९५४ साली स्वतंत्र झाली व १९६३ साली केंद्रशासित प्रदेश कायदा (युनियन टेरिटरीज ॲक्ट) पारित झाल्यावर ती केंद्रशासित प्रदेश झाली. तेथे ५ महत्वाच्या जमाती रहात होत्या, कट्टू, नायकार, इसलास, दूरकुलार, वेट्टाईकरन. त्या फारच प्राचीन काळापासून, अगदी फ्रेंच लोक येण्याच्या आधीपासून पाँडेचेरीमध्ये रहात होते. फ्रेंच लोकांनी यातील काही जातींची नावे गावांना दिली.

स्वातंत्र्यानंतर भारतात सर्व ठिकाणी जनगणना झाली. मात्र पाँडेचेरीतील अनुसूचित जमातींची जनगणना केली नाही. याचे कारण असे दिले की, पाँडेचेरीमध्ये अनुसूचित जमाती नाहीत, परंतु तेथे अनुसूचित जाती रहात असल्याचे खूप पुरावे आहेत. एस.एस.आय.ने "भारतातील लोक" हा अभ्यास केला आहे. त्यात त्यांनी या जाती ओळखल्या आहेत व त्यांची वैशिष्टे सांगितली आहेत. ते कसे भटके आहेत, त्यांची परिस्थिती कशी गरीबीची आहे. तरी सुद्धा भारतसरकारने त्यांना पाँडेचेरीतील अनुसूचित जमातींचा दर्जा दिला नाही. भारत सरकारने पाँडेचेरी मध्यवर्ती विद्यापीठाला अशा जातींच्या अस्तित्वाची ग्वाही दिली. भारत सरकारने हा अभ्यास केला होता. त्यानंतर पाँडेचेरीच्या विधानसभेने एक ठराव करुन भारत सरकारला विनंती केली की, राष्ट्राध्यक्षांचा आदेश काढून पाँडेचेरीतील अनुसूचित जमातीला मान्यता द्यावी. परंतु हे सर्व प्रयत्न फुकट गेले व आजही या अनुसूचित जमातीला मान्यता दिली गेली नाही. पाँडेचेरी ही भारत सरकारच्या गृहमंत्रालयाच्या अधिपत्याखाली काम करते. त्यामुळे भारत सरकारकडे जाण्याखेरीज त्यांना पर्याय नाही. गेल्या चार वर्षात मी स्वतः गृहमंत्रालय व आदिवासी मंत्रालयाच्या निबंधकांकडे (रजिस्ट्रार) या आदिवासी जमातींच्या अस्तित्वाचे सर्व पुरावे दिले, पण प्रत्येक जण म्हणतात. तेथे अनुसूचित जमाती नाहीत. हा मानवी प्रश्न आहे.

आज त्यांना अनुसूचित जमाती म्हणून मान्य नाही, इतर मागासलेल्या जाती म्हणून मान्यता नाही, किंवा एम.बी.सी. म्हणूनही मान्यता नाही. त्यांना पुढारलेल्या जाती किंवा पाँडेचेरीतील इतर जाती समजले जाते. भारत सरकारने तातडीने याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांनी कोणताही अभ्यास करावा. अनुसूचित जातींचे आयुक्त पाँडेचेरीमध्ये आले होते. ते लोक कुठे रहातात, कसे रहातात हे आयुक्तांनी पाहिले. आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले की हे लोक आहेत व त्यांना मान्यता दिली पाहिजे. सर्वजण या लोकांबाबत फक्त बोलतात, पण

प्रत्यक्षात कृती कोणीच करीत नाहीत, त्यामुळे या लोकांना कसलेच फायदे मिळत नाहीत. आर्थिक, शैक्षणिक किंवा समाजिक. थे इकडेही नाहीत व तिकडेही नाहीत. ते अत्यंत वाईट व हलाखीच्या परिस्थितीत रहातात. त्यांना सामाजिक न्याय मिळणे हे केवळ स्वप्नच राहिले आहे. आपण त्यांच्यासाठीच काही करत नाही. म्हणून मी अशी विनंती करतो की, जोपर्यंत भारत सरकार त्यांना मान्यता देत नाही तोवर कृपया पॉंडिचेरी सरकारने त्यांना अनुसूचित जमाती म्हणून मान्यता द्यावी व केवळ यांच्यासाठीच असलेल्या खास योजनेखाली मिळणारे सर्व फायदे द्यावेत. धन्यवाद.

दुपारी ५ वाजून ४४ मिनिटे

**श्री. बी.महताब (कटक)** : श्री. हरीभाऊ राठोड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. मी या सभागृहापुढे दोन मुद्दे मांडतो. एक विमुक्त जातीमध्ये बऱ्याच जातींचा समावेश होतो व दुसरा भारतामध्ये शिवाय जगातल्या मोठ्या भागात जातीमुळे व्यक्तीला प्रतिष्ठा मिळते. यामध्ये काही उपहास केला नाही. एखाद्या जातीला विमुक्त करताना समाज व व्यवस्थापन जनतेचा एका मोठ्या भागाची ओळख नाहीशी करतो.

इतिहासात असे नमूद केले आहे की, १७ व्या शतकात एका मोठ्या भागाला गुन्हेगार ठरवले गेले त्यानुसार १८३९, १८७७, १८९७, १९११ व त्यानंतर १९२३ साली त्या कायद्यात वारंवार दुरुस्त्या केल्या गेल्या. १९४९ साठी गुन्हेगारी कायदा चौकशीसाठी अनंत सायन्ना अयमेगार समिती स्थापन केली. १९५३ साली तो कायदा रद्द झाला, परंतु गुन्हेगारीची सवय असलेल्यासाठीचा कायदा (हॅबिच्युअल ऑफेंडर ॲक्ट) हा नवा कायदा अमलात आला. याचा अर्थ असा निघतो की ज्या जाती विमुक्त म्हणून जाहीर झाल्या किंवा त्या कायद्यात ज्या जाती नमूद केल्या आहेत त्यांचा जनगणनेत समावेश व्हायला हवा होता. मी व सर्व सभागृह याबाबत काळजी व्यक्त करीत आहे. या बाबीला एक विकासाचा दृष्टीकोन आहे, तसेच गुन्हेगारीचाही दृष्टीकोन आहे. गुन्हेगारीच्या दृष्टीकोनाबाबत पन्नाशीच्या दशकात कृती झाली पण विकासाच्या दृष्टीकोनाबाबत काही कृती करणे आवश्यक आहे. या जातीच्या लोकांना आपण निरनिराळ्या विकास कार्यक्रमात सहभागी करुन घेतले पाहिजे. आपण त्यांना जनगणनेत समाविष्ट केले पाहिजे, त्यांना शैक्षणिक व इतर कार्यात समाविष्ट केले पाहिजे.

आपल्या घटनेने आपल्याला काही मूलभूत हक्क दिले आहेत. पण त्याच वेळी आपण राष्ट्रसंघाच्या सनदेचा एक भाग आहोत. आपण मानवी हक्कांसाठी कटीबद्ध आहोत. मानवाला तीन गोष्टी प्रतिष्ठा देतात. मानव म्हणून प्रत्येक जात, जमात व प्रत्येक लिंगाचा तो हक्क आहे. लोकशाही देश म्हणून भारतीय प्रशासन, भारताचा प्रत्येक सुजाण नागरीक हा प्रत्येकाला सन्मान, मान्यता व सुरक्षा देण्यास कर्तव्यबद्ध आहे. महोदय, ओरिसामध्ये अनेक विमुक्त जाती आहेत. मी त्यांची नावे सांगतो किंवा मंत्री महोदयांनी ओरिसा तसेच विविध राज्यातील भटक्या व विमुक्त जातींची यादी वाचावी. संपूर्ण यादी इथे आहे. ती मी पुन्हा सांगत नाही. मला लोकांच्या मोठ्या भागाची विशेषतः ओरिसातील काळजी वाटते. केंद्र सरकारने एक अधिसूचना काढून अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना आश्रम शाळेत प्रवेश घ्यायला बंदी केली आहे. आता ओरीसा सरकारच्या अधिकाऱ्यांनी त्याचा अर्थ असा लावला आहे की, आश्रम शाळेत फक्त आदिवासी व्यक्ती प्रवेश घेऊ शकतात. अनुसूचित जातींचे विद्यार्थी तेथे प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यांना वेगळ्या शाळेत शिकावे लागते. आदिवासी विभागात दलित समाजातील व अनुसूचित जातींच्या व्यक्ती रहातात. कंधामाला जिल्ह्यात असा प्रश्न उभा राहिला आहे. अध्यादेश स्पष्ट असला पाहिजे. मला असे वाटते की, मंत्री महोदय यात लक्ष घालतील व विविध राज्यसरकारांना असा आदेश देतील की, आश्रमशाळेत प्रवेश घेण्यापासून कोणालाही आडकाठी असू नये. या

शाळांत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकांनाही शिकायला मिळायले पाहिजे. तसेच विमुक्त व भटक्या जातींच्या लोकांना सुद्धा या शाळेत शिकायला मिळणे आवश्यक आहे.

महोदय मी आपला आभारी आहे.

**अध्यक्ष (श्री. अर्जुन सेठी)** : श्री. लक्ष्मण सिंग, आपण फक्त एक स्पष्टीकरण मागू शकता.

दुपारी ५ वाजून ४९ मिनिटे

**श्री. लक्ष्मण सिंग (राजगड) :** महोदय, धन्यवाद. मी फक्त अर्धा मिनिट घेईन. मला अंदमान व निकोबार बेटातील आदिवासींबद्दल बोलायचे आहे. सरकार त्यांच्यासाठी असलेल्या कल्याणकारी कार्यक्रमांसाठी खूप पैसे देत आहे, पण ते त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. या बेटावर सुनामी आली होती, तेव्हा बेटावरील जलवा नावाच्या जातीच्या लोकांना तिचा फार मोठा फटका बसला, तेव्हा मी अशी विनंती करतो की, मंत्री महोदयांनी कृपया अंदमानचा दौरा करुन स्वतः परिस्थिती पहावी व योजनेची योग्य व कसोशीने पहाणी करावी.

धन्यवाद.

**श्रीमती तेजस्विनी गावडा (कनकपुरा) :** महोदय, मंत्र्यांनी काही सदस्यांनाही बरोबर घेऊन जावे.

दुपारी ५ वाजून ५० मिनिटे

**सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्री (श्रीमती मीरा कुमार)** : अध्यक्ष महाशय, माननीय सदस्य श्री. हरीभाऊ राठोडजी यांचे दुःख गहिरे आहे व विमुक्त व भटक्या जातींबाबत अर्ध भटक्या जातींबद्दल बराच काळ त्यांना चिंता आहे. इथे असलेल्या अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या दुःखात व चिंतेत भाग घेतला आहे व अत्यंत भावनापूर्ण भाषणे दिली आहेत व त्यांच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे. १७ सदस्यांनी आपले विचार मांडले. बहुतेक सर्वांनी विमुक्त जातींच्या इतिहासाचे विवेंचन केले. मी त्याबाबत जास्ती बोलत नाही. पण इतकेच सांगेन की जेव्हा स्वातंत्र्याची पहिली लढाई १८५७ साली झाली, तेव्हापासूनच इंग्रजांना चिंता लागून राहिली की भारतावर आपली सत्ता टिकवण्यासाठी कोणत्या जातींवर व कोणत्या वर्गावर दडपशाही चालवली पाहिजे. मला असे वाटते की याच विचाराने त्यांनी १८७१ साली हा गुन्हेगारी जमात कायदा (क्रिमीनल ट्राइब्ज ॲक्ट) पारित केला. तो अशा तऱ्हेने केला की जे वर्ग भटके असल्यामुळे गनिमी युद्ध करु शकतात, त्यांना केवळ गुन्हेगार ठरवायचे नाही, तर त्यांना सरकारी दबाव तंत्राने यातना द्यायच्या व हाल भोगायला लावयचे. एवढेच नव्हे तर समाजात त्यांच्याबद्दल संशयाचे व अविश्वासाचे वातावरण निर्माण करायचे. त्यांच्यावर कलंक लावायचा भारत स्वतंत्र होईपर्यंत इंग्रजांनी हे केले. भारत स्वतंत्र झाल्यावर १९४९ मध्ये यावर पुनःविचार केला गेला. तेव्हा असे लक्षात आले की, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला त्यांनाच गुन्हेगार व अपराधी ठरवले गेले आहे व त्यांना निरनिराळ्या तऱ्हेच्या यातना दिल्या जात आहेत. राठोडजींनी सांगितले की, या जातींच्या ज्या घरात मूल जन्माला येते त्या घरात त्यांच्या कपाळावर एक मोहर उमटवली जायची की हा अपराध्याचा मुलगा आहे, अपराधीच होणार. १९४९ साली यावर पुनर्विचार केला गेला. समिती स्थापन केली गेली व १९५२ मध्ये हा कायदा रद्द केला. अनंतशयनम अय्यंगार चौकशी समितीने त्यावेळी सांगितले की अपराधी म्हणून घोषित केल्या होत्या अशा १४७ जाती आहेत. त्यांना विमुक्त केले गेले. १९५३ मध्ये मागासलेल्या वर्गाच्या आयोगाची स्थापना झाली. आपल्याला काका कालेलकर समिती माहिती आहेच. त्यांनी ठामपणे सांगितले की, यापुढे या जातींना कोणीही अपराधी जाती म्हणणार नाही. त्यांनी अशी शिफारस केली की यांना विमुक्त जाती म्हणावे. समितींनी अशाही शिफारस केली की, त्या जातींच्या आर्थिक विकासासाठी, शिक्षणासाठी, सुरक्षिततेसाठी व पुनर्वसनासाठी कार्यक्रम राबवले जावेत. त्यानुसार कार्यक्रम होऊ लागले. यातील काहींना अनुसूचित जातीमध्ये, काहींना अनुसूचित जमातीमध्ये तर काहींना इतर मागासवर्गीयांमध्ये सामील केले गेले. त्या सुविधा यांनाही मिळायला लागल्या. अशाच तऱ्हेने अन्य मागासल्या वर्गांना जे फायदे मिळत होते ते यांनाही मिळायला लागले. हे होत राहिले, परंतु यांचे काही वेगळे प्रश्न आहेत, कारण हे भटके आहेत, एका ठिकाणी रहात नाहीत. उदर भरणाची साधने शोधायला इकडे तिकडे भटकतात. हिमालयाच्या कुशीत व जंगलात रहातात. जेव्हा वातावरण प्रतिकूल होते तेव्हा ते जागा बदलतात. यांना गुन्हेगार घोषित केले असल्यामुळे ते घाबरतात व

एका ठिकाणी रहात नाहीत, फिरत रहातात म्हणून यांच्याकडे बी.पी.एल. कार्ड (दारिद्रय रेषेखाली असल्याचे प्रमाणपत्र) नाही, रेशनकार्ड (शिधावाटप पत्र) नाही व मतदार ओळखपत्र नाही. आपण दारिद्रय निर्मूलनासाठी अनेक कार्यक्रम राबवतो. आता म.न.रे.गा. कार्यक्रम चालू आहे. या खेरीज मंत्रालयातर्फे अनुसूचित जातींसाठी कार्यक्रम चालू आहेत. आदिवासी मंत्रालयातर्फे अनुसूचित जमातींसाठी कार्यक्रम चालू आहेत. यासाठी कोणत्या ना कोणत्या तरी तऱ्हेने यांचे ओळखपत्र किंवा कायमचा पत्ता असणे आवश्यक आहे. जर यातील कोणतीच गोष्ट नसेल तर हे लोक या कार्यक्रमांचा फायदा मिळवू शकत नाहीत, म्हणून या लोकांची परिस्थिती इतरांपेक्षा वेगळी आहे. हे लक्षात घेऊन यांच्या कल्याणासाठी २३.१०.२००३ रोजी एक आयोग स्थापन केला गेला. ज्या योगे यांच्या विशेष प्रश्नांसाठी वेगळी पाऊले उचलता येतील. काही कारणांनी हा आयोग काम करु शकला नाही व अहवाल न देताच ३१.११.२००४ ला विसर्जित झाला. अहवाल प्राप्त झाल्यावर आम्ही त्यांच्यावर कृती करणार होतो. त्यामुळे आम्ही १४.०३.२००५ रोजी पुन्हा दुसऱ्या आयोगाची स्थापना केली. त्या आयोगाने देशभर दौरा केला. सखोल अभ्यास केला व ०२.०७.२००८ ला अहवाल दिला. यात वेळ गेला. आम्ही अहवालाची वाट पहात होतो म्हणून कृती करु शकलो नाही.

**अध्यक्ष (श्री. अर्जुन सेठी) :** माननीय सदस्यहो, आता संध्याकाळचे सहा वाजले आहेत. जर सभागृहाची संमती असेल तर चालू ठरावाचे कामकाज पूर्ण करुन तेलंगाणाबाबत प्रस्ताव पुढे सादर होणार आहे त्याची सुरुवात करता येईल. वेळ वाढवायला सभागृहाची संमती आहे का?

**अनेक सभासद :** होय.

**अध्यक्ष :** यासाठी जास्तीत जास्त १० -१२ मिनिटे लागतील. मंत्री महोदय पाच मिनिटे घेतील व ज्या सदस्यांनी प्रस्ताव मांडला, ते पाच मिनिटे बोलतील. ते प्रस्ताव सदनापुढे मांडतील.

**श्रीमती मीरा कुमार :** अध्यक्ष महोदय, मी या आयोगाची थोडी माहिती देते. या आयोगाने ७६ सूचना केल्या आहेत. या सूचनांची आम्ही १३ विभागात विभागणी केली आहे, जसे विमुक्त जाती कशा ओळखायच्या, त्यांना ओळखण्याची कागदपत्रे कशी करायची, त्यांना दारिद्रय रेषेखालील ओळखपत्र, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र कसे द्यायचे. महत्वाचे म्हणजे त्यांच्या घरचा पत्ता व वस्त्यांचा प्रश्न, कारण त्यांना गावात राहू द्यायचे आहे. गावात जागा नाही, जमीनच नाही तर आम्ही त्यांना जमीन घेऊन स्थिर कसे करायचे? त्यांच्या शिक्षणाची व सुरक्षिततेची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**श्री. डी. विठ्ठलराव (महबूब नगर) :** महोदय, ते गावात रहात नाही, गावाबाहेर रहातात.

**श्रीमती मीरा कुमार :** आम्ही गावाबाहेर कुणाला, कशासाठी राहू देऊ? गावाबाहेर राहिल्यानेच सगळी संकटे येतात. आम्हाला त्यांना मुख्यधारेत आणायचे आहे. आम्ही गावाबाहेर कुणालाही राहू देणार नाही. सगळे

गावातच रहातील. त्यांना रोजगार मिळावेत, त्यांची मालमत्ता निर्माण व्हावी, त्यांना रोजगारभिमुख प्रशिक्षिण मिळावे व ते सुरक्षित रहावे यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. तसेच जितक्या विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जाती जमाती आहेत, त्यांच्या पिढ्या बहूश्रुत आहेत. त्यांनी स्थानिक परिस्थिती, शेती, पशुधन, वातावरण परिवर्तन, संगीत, नृत्य यात ज्ञान मिळवले आहे. कदाचित आपण त्यांना अज्ञान म्हणू. आम्ही ते गमावू इच्छित नाही. त्यांच्याकडे खूप ज्ञान आहे. त्यांच्याकडे काहीच नाही असे आपण म्हटले तर इंग्रज म्हणाले तेच आपणही म्हणू. ही फार मोठी ठेव आहे व यावर संशोधन झाले पाहिजे. त्यांची संस्कृती आपण जतन करुन ठेवली पाहिजे. या ७६ शिफारसी आहेत. काही राज्य सरकारांशी संबंधित आहेत, काही केंद्र सरकारांशी, काही दोघांशीही, तर काही घटना दुरुस्तीशी संबंधित आहेत. या आयोगाला जी संदर्भदर्शक तत्वे दिली होती, त्यात घटना दुरुस्तीबाबत संदर्भ नव्हता, परंतु त्यांनी या शिफारसी केल्या आहेत. या शिफारसींवर आमच्या मंत्रालयाने सखोल विचार केला. त्यानंतर एक कॅबिनेट नोट बनवली आहे व ती १७.०९.२००८ सर्व मंत्रालयाकडे त्यांच्या शेऱ्यासाठी पाठवली आहे व आम्ही मंत्रालयाच्या उत्तराची प्रतिक्षा करीत आहे. आम्ही सर्व तऱ्हेने प्रयत्न करीत आहोत. मी हरीभाऊ राठोडजी व इतर सन्माननीय संसद सदस्यांना आश्वासन देते की १९४९ व १९५३ नंतर २००५-२००८ मध्ये पहिल्यांदा यूपीए सरकारने असा विशेष आयोग स्थापन केला आहे. आम्ही या बाबतीत जागरुक आहोत. हे आम्हाला करायचे आहे व आम्ही करु. या वेळी १५ राज्यात ३१३ विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जाती आहेत. त्यांच्या याद्या आमच्याकडे आहेत. आम्ही तेच काम करीत आहोत. मी माननीय सदस्यांना विनंती करते की, त्यांनी आपला प्रस्ताव मागे घ्यावा.

संध्याकाळी ६ वाजून ७ मिनिटे

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** महाशय, मी माननीय मंत्रीजींचा मनःपूर्वक आभारी आहे. त्यांनी आमच्या सुरात सूर मिसळले. ज्या भावना जागवल्या आहेत त्यामुळे सर्व देशाची १५ कोटी जनता धन्य झाली आहे. या महान संसदेमध्ये, या महान पंचायतीमध्ये आमच्याबद्दल बोलणारा कोणी आले आहेत व सर्व संसद त्यांच्याबरोबर एकवटली आहे असे पहिल्यांदाच झाले आहे. आज मला असे वाटत होते की, याबाबत कुणीच बोलणार नाही कारण विमुक्त व भटक्या जातींबद्दल फारच थोडया लोकांना माहिती आहे. आज ६० वर्षात आपल्या माध्यमातून आपल्या संसदेच्या माध्यमातून विमुक्त व भटक्या जातींच्या बाबतीत बोलणे झाले. प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचा मी खूप आभारी आहे. त्यांनी या विषयात खूप रस घेतला. ज्यावेळी मी ड़ॉ. मनमोहन सिंग यांना भेटलो त्यावेळी मला असे लक्षात आले की, त्यांना या जातीच्या लोकांच्या दुःखाची व यातनांची जाणीव आहे. श्रीमती मीरा कुमार यांच्या निवेदनाने आपल्या देशाचे १५ कोटी लोक संतुष्ट झाले आहेत. माझी एक शंका आहे व एक सूचना आहे. ज्या १३ विविध मंत्रालयांना पत्र पाठवली आहेत त्यांच्याकडून शेरे आलेच पाहिजे अशी गरज नाही. मंत्रीमंडळाने असा निर्णय घ्यावा की विमुक्त व भटक्या जातींसाठी आपण आरक्षणाचे वेगळे धोरण केले पाहिजे. हा निर्णय घेऊन जर आपण जनतेला सामोरे गेलो तर फार चांगले होईल. ज्या प्रकारे घटनेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची सूची आहे, तशीच विमुक्त व भटक्या जाती जमातींची सूची केली पाहिजे. हे आपण शासकीय अध्यादेशाद्वारे करु शकतो. आपण इतर मागासवर्गीयांसाठी काय केले? मंडल आयोगाच्या शिफारसी आपण अमलात आणल्या तेव्हा घटनेची/संसदेची मान्यता घेतली नव्हती. मंडल आयोगाचा अहवाल शासकीय अध्यादेशाद्वारे लागू झाला आहे. आपण तसेच करावे. आपल्या ज्या इतर योजना आहेत, त्या आपण तयार करीत रहाव्यात. मला असे वाटते की, आगामी निवडणुकांच्या आधी हे झाले तर ठीक आहे. पुढच्या वेळी मी निवडून येईन की नाही सांगता येत नाही. आपला आशिर्वाद असेल तर निवडून येईन.

महाशय माझी दुसरी सूचना अशी आहे की, निर्णय घ्यायच्या आधी आपण सर्वपक्षीय बैठक घ्यावी. इतर मागासवर्गीयांचे नेते, जसे लालूप्रसाद यादवजी, शरद यादवजी, शरद पवारजी यांना बोलावून एक बैठक घ्यावी व आपण काय करणार आहात याबाबत सांगावे. आपण क्रांतीकारक निर्णय घेणार आहात. आपण संवेदनशील आहात. आम्ही आपली संवेदना जाणतो. (अडथळा)

**अध्यक्ष (श्री.अर्जुन सेठी) :** माननीय मंत्री महोदय यांच्या आश्वासनानंतर आपण आपला ठराव परत घेत आहात काय?

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** मी ते घोषित करीन. मला थोडा वेळ द्या.

**अध्यक्ष :** आपण आपला मुद्दा मांडला आहे.

**सभापती महाशय :** आपण आता आपला प्रस्ताव मागे घ्याल का?

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** महोदय, मला माननीय मंत्री महोदयांकडून एक उत्तर हवे आहे.

**अध्यक्ष :** माननीय मंत्र्यांनी तुम्हाला आश्वासन दिले आहे.

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** महाशय, कोणतीतरी वेळ द्यावी की हे केव्हा होईल? १५ दिवस? एक महिना? मी माझा प्रस्ताव मागे घेईन.

**अध्यक्ष :** श्री. राठोड, माननीय मंत्री महोदयांनी ते सूचित केले आहे व आश्वासनही दिले आहे. आपण आपला प्रस्ताव मागे घ्याल का?

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** आपण मला याबाबत आदेश द्या. मी प्रस्ताव मागे घेईन.

**अध्यक्ष :** ते शक्य नाही. माननीय मंत्री महोदयांना आपल्याला आश्वासन दिले आहे. आपणही मान्य करता की माननीय मंत्र्यांनी आपल्याला आश्वासन दिले आहे. हे लक्षात घेता आपण आपला प्रस्ताव मागे घ्याल का?

**श्रीमती मीरा कुमार :** राठोड साहेब, आम्ही आपल्यापेक्षा वेगळे नाही, आयोगाने ज्या शिफारसी केल्या आहेत त्या मंत्रालयांना पाठवल्या आहेत. आम्ही त्याची (उत्तरांची) वाट पहात आहोत. कृपया आपण आपला ठराव मागे घ्यावा.

**श्री. हरीभाऊ राठोड (यवतमाळ) :** महाशय, मीरा कुमारजींना आपल्या समक्ष आश्वासन दिले आहे.मी माझा प्रस्ताव मागे घेऊ इच्छितो.

**अध्यक्ष :** हे फार चांगले झाले.

**अध्यक्ष :** श्री. हरीभाऊ राठोड यांनी मांडलेला प्रस्ताव मागे घेणे या सभागृहाला मान्य आहे काय?

(सभागृहाच्या परवानगीने प्रस्ताव मागे घेतला गेला)

२००८ चे ८वे विधेयक

घटना दुरुस्ती विधेयक २००८

श्री. हरीभाऊ राठोड, खासदार

घटनेमध्ये पुढील दुरुस्ती करावी

भारतीय गणराज्याच्या ५९ व्या वर्षात संसदेद्वारा खालील कायदा पारित केला जात आहे.

संक्षिप्त शीर्षक व सुरुवात

१. (१) या कायद्याला घटना दुरुस्ती २००८ म्हटला जाईल.

(२) हा कायदा भारत सरकार जेव्हा राजपत्रात अधिसूचित जारी करील तेव्हापासून व कायद्यात दिलेल्या वेगवेगळ्या प्रावधानांनुसार वेगवेगळ्या दिवशी लागू होतील.

२. घटनेच्या १५(४) या कलमामध्ये "अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती" या शब्दांऐवजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती हे शब्द घातले जातील.

| | |
|---|---|
| कलम १६ ची दुरुस्ती | ३. घटनेच्या १६ (४)अ कलमामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या शब्दांऐवजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती हे शब्द घातले जातील. |
| कलम ४६ बदलणे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती समाजाच्या इतर दुर्बळ घटकाच्या आर्थिक व शैक्षणिक हितसंबंधाचे संरक्षण | ४. घटनेच्या ४६ व्या कलमाऐवजी खालील कलम घातले जाईल.<br>सरकार समाजाच्या दुर्बळ घटकांच्या विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देईल व त्यांचे सर्व तऱ्हेच्या शोषणापासून व सामाजिक अन्यायापासून संरक्षण करील. |
| कलम ३३० बदलणे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांच्यासाठी जनसदनात आरक्षण | ५. घटनेच्या ३३०व्या कलमाऐवजी खालील कलम घातले जाईल.<br>३३०(१) जनसदनांमध्ये खालील प्रमाणे जागांचे आरक्षण केले जाईल.<br>अ. अनुसूचित जातींसाठी<br>ब. आसाममधील स्वायत्तजिल्हे सोडून इतर असलेल्या अनुसूचित जमातींसाठी<br>क. आसाममध्ये असलेल्या स्वायत्त जिल्ह्यामधील अनुसूचित जमातींसाठी<br>ड. अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींसाठी<br>कलम (१) खाली<br>२. एखाद्या राज्यातील किंवा केंद्रशासीत प्रदेशांच्या जनसदनातील एकूण जागा व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांच्यासाठी आरक्षित जागा यांचे |

| | | |
|---|---|---|
| | गुणोत्तर प्रमाण व त्या राज्यातील किंवा केंद्रशासीत प्रदेशातील एकूण जनसंख्या व त्या राज्यातील वा केंद्रशासीत प्रदेशातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींची एकूण जनसंख्या यांचे गुणोत्तर प्रमाण. ही दोन्ही गुणोत्तर प्रमाण शक्य तितकी सारखी ठेवली जातील.<br>३. उपरोक्त कलम (२) मध्ये काहीही असले तरीही आसामातील स्वायत्त जिल्ह्यांमधील जनसदनामधील एकूण जागा व अनुसूचित जमातीसाठी आरक्षित जागा यांचे गुणोत्तर प्रमाण व आसाममधील स्वायत्त जिल्ह्यांमधील एकूण जनसंख्या व त्या जिल्ह्यांमधील अनुसूचित जमातींची एकूण जनसंख्या याचे गुणोत्तर प्रमाण ही दोन्ही शक्यतो सारखी ठेवली जातील.<br>खुलासा : या कलमात व कलम क्र.३३२ मध्ये 'जनसंख्या' म्हणजे ज्या शेवटच्या जनगणनेनुसार त्या त्या संख्या जाहीर केल्या आहेत, ती संख्या. मात्र जोपर्यंत २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेच्या त्या त्या जनसंख्या जाहीर होत नाहीत, तोपर्यंत संदर्भ संख्या म्हणून २००१ सालच्या जनगणनेत जाहीर झालेली जनसंख्या ही आधारभूत समजली जाईल. | २५<br>३०<br>३१ |
| कलम ३३२ बदलणे. प्रत्येक राज्याची विधानसभेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींसाठी आरक्षण | ६. घटनेचे ३३२ कलम खालीलप्रमाणे बदलले जाईल.<br>कलम ३३२ –<br>१. आसाममधील स्वायत्त जिल्हे वगळून इतर सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींसाठी आरक्षण केले जाईल.<br>२. आसाम विधानसभेमधील आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांमध्ये आरक्षण केले जाईल.<br>३. कलम (१) खाली एखाद्या राज्यातील विधानसभेमधील एकूण जागा व अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांच्या आरक्षित जागांचे गुणोत्तर प्रमाण त्या राज्यातील एकूण जनसंख्या व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांची जनसंख्या गुणोत्तर प्रमाण ही दोन्ही गुणोत्तर प्रमाणे शक्य तितकी सारखी असतील.<br>३A. उपरोक्त कलमांध्ये काहीही असले तरीही जोपर्यंत घटनेच्या कलम १७० प्रमाणे २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेनुसार समायोजन होत नाही, तोपर्यंत अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड या राज्यांच्या विधानसभांमध्ये आरक्षित जागांची संख्या अशी असेल :<br>अ. जर घटनेचा (४७वी दुरुस्ती) कायदा १९८७ (यापुढे या कलमाला सध्या अस्तित्वात असलेली विधानसभा असे संबोधले जाईल.) अमलात येण्याच्या दिवशी सर्व जागा अनुसूचित जमातीच्या उमेदवारींनीच भरल्या असतील (म्हणजे सर्व | १०<br>१५<br>२० |

| | |
|---|---|
| | विधानसभा सदस्य जर अनुसूचित जमातीचे असतील, तर एक सोडून सर्व जागा.<br>ब. अन्यथा उपरोक्त दिवशी त्या त्या राज्यांची लोकसंख्या व त्या त्या राज्यांतील अनुसूचित जमातींची लोकसंख्या यांचे जे गुणोत्तर प्रमाण असेल त्या गुणोत्तर प्रमाणात.<br>३B. उपरोक्त कलम (३) मध्ये काहीही असले, तरीही जोपर्यंत २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेनुसार समायोजन होत नाही तोपर्यंत त्रिपुरा विधानसभेतील अनुसूचित जमातींसाठी आरक्षण केलेल्या जागा या घटनेच्या (७७वी दुरुस्ती) कायदा १९९२ज्या दिवसापासन अमलात येईल त्या दिवशी त्या विधानसभेमधील एकूण जागा व अनुसूचित जमातींसाठी आरक्षित जागा यांचे गुणोत्तर प्रमाण असेल त्यापेक्षा कमी नसेल.<br>४. आसाममधील स्वायत्त जिल्ह्यांसाठी आरक्षित जागा व आसाम विधानसभेतील एकूण जागा यांचे गुणोत्तर प्रमाण हे आसामची एकूण जनसंख्या व त्या जिल्ह्यातील लोकसंख्या यांचे गुणोत्तर प्रमाणापेक्षा कमी नसेल.<br>५. स्वायत्त जिल्ह्यांसाठी राखून ठेवलेले मतदार संघामध्ये जिल्ह्याबाहेरचे क्षेत्र अंतर्भूत असणार नाही.<br>६. सदर स्वायत्त जिल्ह्यांमधून अशी कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यांमदील अनुसूचित जमाती सदस्य नसलेली कोणतीही व्यक्ती अशा स्वायत्त जिल्ह्याच्या मतदार संघातून निवडणूक लढण्यास पात्र असणार नाही. मात्र आसाम विधानसभेच्या निवडणूकीसाठी बोडोलँड क्षेत्रातील जिल्ह्यांतील मतदार संघ म्हणून जे मतदार संघ सूचित केले आहेत त्यातील अनुसूचित केलेल्या जमातीचे प्रतिनिधीत्व व अनुसूचित न केलेल्या जमाती व बोडोलँड क्षेत्रातील जिल्हे म्हणून सूचित करण्यापूर्वीचे या जमातीचे प्रतिनिधीत्व हे सारखेच ठेवले जाईल. |
| कलम ३३४ मध्ये बदल. | ७. कलम ३३४ (अ) मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या शब्दांऐवजी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती हे शब्द घातले जातील. |
| कलम ३३५ मध्ये बदल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांचे दावे | ८. घटनेतील कलम ३३५ ऐवजी खालील कलम घातले जाईल.<br>कलम ३३५ – एखाद्या राज्यातील व केंद्रातील सेवांमध्ये पदांची भरती/नेमणूक करताना प्रशासनाची कार्यक्षमता राखून, सदर पदांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांचे दावे विचारात घेतले जातील. मात्र या कलमामुळे केंद्रातील किंवा राज्यांतील कोणत्याही सेवांमधील पदांसाठीच्या बदलीच्या मामल्यांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांच्यासाठी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले गुण कमी करणे किंवा तपासणीचा दर्जा कमी करणे यासाठी बाधा येणार नाही. |
| नवे कलम ३४२अ घालणे. | ९. घटनेतील कलम ३४२ नंतर खालील कलम घातले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती | ३४२A<br>१. माननीय राष्ट्रपती या घटनेच्या केंद्रशासीत प्रवेशाबाबत तरतुदींसाठी सल्लामसलत करुन अधिसूचनेद्वारा राज्यांच्या बाबतीत राज्यपालांशी कोणत्याही आदिवासींना किंवा आदिवासी जमातींना किंवा त्यांच्या मधल्या गटांना त्या त्या राज्यासाठी किंवा केंद्रशासीत प्रदेशासाठी अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमाती म्हणून घोषित करु शकतात.<br>२. उपरोक्त (१) नुसार जारी केलेल्या अनुसूचित विमुक्त जमाती व भटक्या जमातींच्या यादीतन संसद कायदा पारित करुन कोणत्याही विमुक्त जमाती व भटक्या जमातींना किंवा त्यांच्या गटांना वगळू शकते किंवा अशा जमातींची किंवा त्यांच्या गटाची या यादीत भर घालू शकते. मात्र उपरोक्त (१) नुसार जारी केलेल्या यादीत त्यानंतरच्या दुसऱ्या अधिसूचनेने बदल करता येणार नाही. | २०<br><br><br><br><br><br>२५ |

## उद्देश व कारणे

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या सदस्यांना कित्येक वर्षे घटनेचे संरक्षण मिळाले आहे व त्यांनी आरक्षणाचे फायदेही कित्येक वर्षे मिळाले आहेत. तथापी दुर्दैवाने कोणीही विमुक्त जमाती व भटक्या जमाती व अर्ध भटक्या जमातींच्या उद्धाराकडे कसलेही लक्ष दिले नाही. या जमाती देशातल्या सर्वात जास्त मागासलेल्या जमाती आहेत. एका अंदाजानुसार अशा जमातींची लोकसंख्या अंदाजे १५ कोटी आहे. या गटात अंदाजे ५० ते ६० जमाती येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात या जमातींना गुन्हेगारी जमाती समजले जात होते. परंतु पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना विमुक्त केले व त्यांना आश्वासन दिले की, त्यांच्या उद्धारासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. योजना आयोगाचे सुद्धा असे मत आहे की, विमुक्त व भटक्या जमातींच्या उद्धाराची आवश्यकता आहे व त्यासाठी भारतातल्या या सर्वात जास्त मागासलेल्या जमातींसाठी आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. तिसऱ्या पंचवार्षिक अर्थसंकल्पात या जमातींसाठी खास तरतूद होती, पण ती कोणतेही सबळ कारण नसताना बंद केली गेली. पंडीत जवाहरलाल नेहरुंच्या मृत्यूनंतर विमुक्त व भटक्या जमींच्या उद्धाराबाबतच्या व विकासाबाबतच्या त्यांच्या शब्दांची बूज राखली गेली नाही. घटनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती वेंकटचलैया यांच्या अध्यक्षते खाली समिती नेमली होती. या समितींच्या विकासासाठी वेगळी अर्थसंकल्पीय तरतूद करावी अशी या समितीने शिफारस केली होती. मंडल आयोगाने सुद्धा या जमातींना वेगळे आरक्षण द्यावे असे सुचवले होते. विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जमातींसाठीच्या आयोगाने आपल्या अंतरिम अहवालामध्ये असे सुचवले होते की, या जमातींना वेगळे आरक्षण द्यावे व त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात वेगळी तरतूद करावी. डॉ. गणेश देवी यांच्या अध्यक्षते खाली स्थापन केलेल्या तांत्रिक सल्लागार गटाने सुद्धा या जमातींसाठी वेगळे आरक्षण द्यावे असे सुचविले आहे. या जमातींची दयनीय परिस्थिती लक्षात घेऊन त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी त्यांना आरक्षण देणे आवश्यक आहे.

हा या प्रस्तावाचा उद्देश आहे.

हरीभाऊ राठोड

नवी दिल्ली

डिसेंबर २००६

## शिफारसी

या आयोगाला विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जमातींबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ मध्ये सूचित केलेल्या जमाती ह्या विमुक्त जमातींमध्ये समाविष्ट आहेत. यापैकी काही जमाती भटक्या जमाती आहेत. भटक्या व अर्धभटक्या जमातींमधील फरक (पूर्वाश्रमीच्या भटक्या व अर्धभटक्या जमाती धरून) हा त्यांच्या एका जागेवरुन दुसऱ्या जागी स्थलांतर करण्याच्या वारंवारीतेवर अवलंबून असते. म्हणून ही वर्गवारी या जातींच्या वेगवेगळ्या प्रश्नांशीसंबंधित कार्य करताना संदर्भीय जाती म्हणून विचार करण्यासाठी दोन ठिकाणी विभागावी, एक विमुक्त जमाती व दोन भटक्या जमाती. यांना यापुढे डीएन्टी असे संबोधले जाईल.

डीएनटी यांच्यासाठी विविध योजना अमलात आणण्यासाठी, राज्यसरकार / केंद्रशासीत प्रदेशांना या जमाती ओळखून काढणे व त्यांची यादी तयार करणे आवश्यक आहे. यांचा तपशील गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा यामध्ये आहे. याचा उपयोग आयोगाद्वारे पाठवलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी राज्यांना /केंद्रशासीत प्रदेशांना होईल. काही राज्यांनी याद्या करुन पाठवल्या आहेत, पण त्यामध्ये डीएनटी मध्ये असलेल्या सर्व जातींचा समावेश नाही. ज्या राज्यांकडे/केंद्रशासीत प्रदेशांकडे अशी यादी नाही/ त्याची यादी अपूर्ण आहे, त्यांनी मुख्य अधिकाऱ्यांच्या अध्यक्षते खाली संबंधित २-३ अधिकारी, डीएनटीचे नेते व एक-दोन नामवंत मानव विकास शास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ यांची समिती स्थापन करावी. ही समिती डीएनटी मध्ये कोणाचा समावेश करावा याबाबत विचार करील . या समितीला सहाय्य करण्यासाठी विविध उद्गमापासून मिळवलेल्या माहितीच्या व पुराव्याच्या आधारे भटक्या जमातींची नावे व तत्सम नावे यांची राज्ये/केंद्रशासीत विभाग निहाय यादी तयार केली आहे. ही यादी फक्त सूचक आहे व योग्य सर्वेक्षण झाल्यानंतरच व पुष्टीकरण झाल्यानंतरच आयोग कोणत्याही जमातींचा डीएनटी मध्ये समावेश करण्याचा विचार करील.